मासिक

# शिक्षण यात्री

वर्ष:२ रे अंक: ८ वा मार्च २०१८ किंमत:४० रूपये



## सावित्रीच्या लेकी...

शिरपूर-वरवाडे नगरपरिषद
शिरपूर, जि. धुळे.



सौ. जयश्रीबेन अमरीशभाई पटेल
नगराध्यक्षा
शिरपूर वरवाडे नगरपरिषद


# सशक्त महिला...सशक्त समाज...!

आपल्या शिक्षणयात्री मासिकाचा महिला दिनानिमित्त अंक प्रकाशित होतोय. हे ऐकून समाधान वाटले. आज सर्वच क्षेत्रात महिला आपले कर्तृत्व सिद्ध करतेय. त्यांना संधी दिली तर त्या संधीचे ते सोने करून दाखवितात ही गोष्ट सिद्ध झाली आहे. ती आता सर्वव्यापी नेतृत्वाची धनी झाली आहे. आपल्या देशाचा व संस्कृतीचा अभ्यास केला तर त्या-त्या काळात नारी शक्तीने आपल्या कर्तृत्वाची साक्ष पटवून दिली आहे.

आज देशाच्या राजकारणात महिला आघाडीवर आहेत. या देशात सर्व क्षेत्रात महिलांना ५०% आरक्षणाची मागणी आहे पण ती अद्यापही मंजूर होत नाही. यामागे राजकारण की पुरूषी अहंकार हे समजत नाही. मला या निमित्त माझ्या भगिनी वर्गाला एक विनंती करावयाची आहे. लोकशाही मार्गाने जी संधी मिळेल ती स्वतःच्या हिमतीने, जबाबदारीने व मनाने स्वतः पार पाडा. जेष्ठांचे मार्गदर्शन जरूर घ्या पण निर्णय स्वतः घेण्याचे शिका. चुका होतीलही पण मार्गही सापडेल.

माझ्यावतीने माझ्या सोबत काम करणाऱ्या सर्वच भगिनी वर्गातर्फे नारीशक्तीला सलाम !


# जागतिक महिला दिनाच्या हार्दिक शुभेच्छा !

धुळे महानगरपालिका, धुळे






सौ. कल्पना (काकु) सुनिल महाले
महापौर
महानगरपालिका धुळे

मासिक
# शिक्षण यात्री
शिक्षकांचे हक्काचे व्यासपीठ
वर्ष : २ रे
अंक: ८ वा  मार्च २०१८

।। ज्ञानम् सर्वजण हिताय ।।

• सह संपादक •
सुभाषदादा कुलकर्णी

• संपादन सहाय्य •
संदेश नंदकिशोर हजारे

• मुखपृष्ठ •
धिरज देशमुख
सौजन्य- आंतरजाल

• मांडणी •
लक्ष्मण बडगुजर
प्रगती आर्टस्,शिरपूर.

• संपर्क •
शिक्षणयात्री
क्रांतीनगर ता.शिरपूर जि.धुळे
चलभाष : 8208301001
shikshanyatri11@gmail.com

लेखात व्यक्त झालेली मते
लेखकांची व्यक्तिगत समजावी

*संपादकीय....*

## सावित्रीच्या लेकींसाठी ...



*डॉ.वैशाली पाटील-देवरे*
*अतिथी संपादक*
*(महिला दिन विशेषांक)*

*८ मार्च, जागतिक महिला दिन! गेल्या १०-१५ वर्षात महिला दिन अनेक ठिकाणी मोठ्या उत्साहात साजरा होत असतांना दिसतो आणि गेल्या २-३ वर्षांपासून समाज माध्यम जसे की फेसबुक, व्हाटस् ॲप याद्वारे तर शुभेच्छांचा महापूर आपण अनुभवत असाल. हा उत्सव या एका दिवसाकरिता मर्यादित राहु नये ही अपेक्षा. हा उत्सव चिरकालिन असावा याकरिता सर्वांनाच महिला दिनाच्या शुभेच्छा !*

*स्त्री आणि संघर्ष हा विषय खरंतर अनेक वर्षापासून अनेक स्तरांवरून अभ्यासला गेला आहे. परंतु तरिही हा विषय निकाली मात्र निघत नाही. प्रत्येक वेळी आव्हानांचा नवा संच तयार असतो. असे असुनही त्या प्रत्येक वेळी स्त्री उभी रहाते खंबीरपणे, चिवटपणे, सृजनशिलतेने. कधी आपल्या आसपासच्या लोकांच्या मदतीने तर कधी स्वतःच स्वतःच्या मनाचा कौल घेत घेत. संघर्ष असतो तरी कशासाठी? कुणासाठी? कुणाविरूद्ध? असे प्रश्न पडत असतात अनेक स्त्रियांना. काहींना उत्तरं मिळतात तर काहींना नव्याने प्रश्नच मिळतात उत्तरादाखल.*

*प्रत्येक संघर्षाची सुरूवात वेगवेगळी असते, संघर्षाची कारणं वेगवेगळी असतात, थोडक्यात काय तर प्रत्येक संघर्ष ही एक कहाणी असते. तुमच्या-माझ्या अगदी कष्टकरी महिलेपासून ते प्रस्थापित महिलेपर्यंत सर्वांना कधी छोट्या तर कधी मोठ्या संघर्षातून प्रवास हा करायचाच असतो. तो कुणासही चुकत नाही हे त्रिकालबाधीत सत्य!*

*एक मात्र नक्की, प्रत्येक स्त्री ही या लहान मोठ्या संघर्षातून जेव्हा विषयी मिळवते तेव्हा मात्र तिचा 'स्व' प्रगल्भ झालेला असतो. हाच प्रगल्भ झालेला 'स्व' मग इतर काजळलेल्या, पिचलेल्या, थकलेल्या मनांना उभारी देण्याचं काम लिलया साधू शकतो. माझ्या या संघर्षाच्या कहाणीतून अनेकांना प्रेरणा मिळु शकते याची जाणीव मात्र व्हावी लागते.*

*'शिक्षणयात्री' चा या अंकाचा विषय ही म्हणूनच की काय या लहान-मोठ्या संघर्षातून पुढे जाणाऱ्या स्वतःचे आणि इतरांचे जीवन समृद्ध करू पहाणाऱ्या सावित्रीच्या लेकींच्या आयुष्यावर प्रकाश टाकणारा आहे. आज*

स्त्री कोणत्या क्षेत्रात कार्यरत नाही? 'ती' चा प्रवेश अगदी सर्व क्षेत्रात झालेला आहे. रूळलेल्या वाटांवरून प्रवास करतांना नविन काही तरी करण्याची आस असणाऱ्या तर अपरिचीत क्षेत्रातही स्वत:चा ठसा उमटवू पहाणाऱ्या काही निवडक लेकींचा प्रवास आपल्यासमोर उलगडण्याचा आमचा प्रयत्न आहे.

अश्याच विविध क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या भगिनींना या महिला दिन विशेष अंकासाठी आम्ही लिहीते करण्याचा प्रयत्न केला आहे. साहित्य या क्षेत्रात कमी शिक्षण घेतल्याची रूखरूख मागे टाकून 'अहिराणी' भाषेची कास धरून विजयाताई मानमोडे यांनी स्वत:ला सिद्ध केलं आहे. तर संगीताताई म्हसकर यांनी संगीत साधनेत खंड पडूनही मोठ्या प्रयत्नाने पुन्हा या वाटेवर वाटचाल सुरूच ठेवली आहे. सौ.मंजुषा भिडे नाट्यक्षेत्रात स्वत:मध्ये असलेल्या अंगीभूत कलागुणांद्वारे अभिव्यक्त होत आहेत.

शिक्षण या क्षेत्रात उच्चशिक्षणाची किंवा उच्चपदाची अनेकवेळा हुलकावणी मिळूनही उद्‌विग्न न होता, स्वत:ला कामात संपूर्णपणे झोकुन देऊन डॉ. शारदा शितोळे यांचा यशस्वी प्रवास सुरू आहे. स्वाती देवांग या स्वत:च्या दृष्टीदोषाचा बाऊ न करता कित्येकांच्या आयुष्यातला 'प्रकाश' होत आहेत. तर डॉ.मधुलिका सोनवणे शिक्षण क्षेत्राद्वारे समाज परिवर्तनासाठी कसोशीने मार्गक्रमण करित आहेत. डॉ. मोनिका अग्रवाल यांनी तर जणु काही अष्टपैलुंत्वाचा अंगीकार करून शिक्षण, स्वास्थ्य, समुपदेशन यासारख्या अनेक क्षेत्राद्वारे स्त्रियांना स्वत:च्या कोशातून मुक्त करायचा यत्न चालवला आहे.

प्रशासनात पुरूषी वर्चस्वाला आव्हान देऊन स्वाती पाटील या स्त्री ही कोणत्याही क्षेत्रात उणी नाही ह्याचे दृश्य उदाहरण आपल्यासमोर ठेवित आहेत. सौ. वनमाला प्रकाश भामरे या 'लग्न' या घटनेमुळे तिथेच थांबून न जाता एका पाठोपाठ एक अनेक पदव्या मिळवून कठिण परिश्रमाने प्रशासकीय सेवेत स्थिर स्थावर झाल्या आहेत.

राजकारण आणि समाजकारण याचा अनोखा संगम सिमाताई रंधे यांच्या ठायी आपणांस पहाण्यास मिळेल तर जुन्या आणि नव्या मतांचा समन्वय साधत सौ.सुषमा सुभाष कुलकर्णी यांनी स्वत:चे आणि परिवाराचे आयुष्य सुंदर केले आहे. याशिवाय अनेक अडचणींचा सामना करत कधी स्वत: झुंजत तर कधी परिस्थितीला झुंजवत सौ.दिपाली सचीन जोशी या यशस्वी उद्योजिका/व्यावसायिक आपल्या समोर एक अनोखी वाट उलगडून दाखवित आहेत. शालिनीताई सोनवणे यांनी प्रस्तुत केलेले महिला विषयक कायद्यांचे ज्ञान अनेकांना उपयोगी ठरावेत असेच आहेत.

'शिक्षणयात्री' च्या या छोट्याश्या अंकात या सगळ्या प्रेरक कहाण्यांचा संकलनातून अनेक प्रश्नांकित मनांना उत्तरे मिळावीत त्यांच्याही वाटा उजळून जाव्यात ही प्रामाणिक इच्छा मनात बाळगून आहोत. हा विशेष अंक आपल्या पसंतीस उतरावा ही प्रार्थना करून पुन्हा एकदा जागतिक महिला दिनाच्या शुभेच्छा! देते.

धन्यवाद.

डॉ.वैशाली पाटील-देवरे
अतिथी संपादक(महिला दिन विशेष)

(डॉ.वैशाली पाटील-देवरे ह्या आर.सी.पटेल एज्युकेशनल ट्रस्ट संचलित इन्स्टीट्युट ऑफ मॅनेजमेंट रिसर्च अॅन्ड डेव्हलोपमेंट महाविद्यालयाच्या प्राचार्या म्हणून कार्यरत आहेत. (संपर्क क्रं.९८२३२९९९७३)

वार्षिक वर्गणी रूपये ३०० मात्र. वर्गणी मनी ऑर्डर किंवा ड्राफ्टने, धनादेशने पाठवावी. किंवा कुठल्याही शाखेत शिक्षणयात्री शिरपूर या नावाने **NEFT-A/C001110305198 IFSC Code-KKBKOSPCB01** (पीपल्स बँक,शिरपूर) भरणा करावे.
पत्ता – शिक्षणयात्री, १ली गल्ली, क्रांतीनगर, शिरपूर जि.धुळे मो.नं.८२०८३०१००१ **Email Id :- shikshanyatri11@gmail.com**
या अंकातील लेखांमधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# सावित्रीच्या लेकी...



**विजया मानमोडे**
पुणे
चलभाष ९४०३९१८९८४

विजया मानमोडे ह्या खान्देश अहिराणी कस्तुरी साहित्य, सांस्कृति, कला क्रीडा मंच पुणे माध्यमातून सामाजिक कार्यक्रमात समरस असून अहिराणी भाषा संवर्धनासाठी अहिराणी साहित्य संमेलन, नाटकांचे आयोजन करतात. त्याचबरोबर संपूर्ण महाराष्ट्रातून 'सौंदर्यसम्राज्ञी' प्रतियोगीता राबवून महिलांना कला-संस्कृती-भाषा जपण्याची संधी निर्माण करून देतात. कमी शिक्षणाने खचून न जाता कथा-कवितांची मांडण करून स्वत:ची ओळख निर्माण करण्यात यशस्वी झाल्या आहेत. त्यांच्या सामाजिक साहित्यीक क्षेत्रातील वाटचालीची दखल घेऊन विविध पुरस्कांनी गौरवण्यात आले आहे.



मी 'विजया'. विजया दशमीच्या दिनी सुरत येथे आई कस्तुराताई आणि वडील छगन आण्णा शिरसाठ यांच्या पोटी जन्म घेण्याचे भाग्य या भुतलावर मिळाले. आमची ताई म्हणजे अन्नपुर्णा शांत, सुस्वभावी, प्रेमळ आणि विशाल मनाची, सागरासारखं सगळं मनात साठवुन घेणारी, क्षमा करणारी, आयुष्यभर कुणालाही न दुखवता राबराब राबणारी, परिवाराला जपणारी ही माझी माय माऊली, संस्कार मुर्ती ! हिच्या विषयी लिहीलं तेवढे कमीच.

आमचे आप्पा कडक, शिस्तबध्द 'फणसा' सारखे पण आतुन प्रेमळ, उंच, रुबाबदार, नजरेला धार तर अशी की त्याकडे पाहताच पाय जागच्या जागी थिजायचे. पण गावावर, भाषांवर, साहित्यावर प्रेम करणारे, वकृत्वावर प्रभुत्व असलेले. आण्णांनी सदा पुस्तकांवर प्रेम करायला शिकवले. म्हणुनच माझ्यातही लिहिण्या वाचण्याची आवड निर्माण झाली आणि आज हे लिहिण्या वाचण्याच्या आवडीमुळेच मी स्वाभिमानाने जगतेय. आप्पा साहित्यावर आणि जीवनावर इतके छान बोलायचे की मी त्यांचे ऐकण्यात समरस व्हायची. त्यामुळे आप्पांचे आणि माझे खुप छान जमायचे. आप्पा हे एकुलते एक होते. त्यांच्या तीन बहिणी, आई-वडील व आम्ही चार मुली, तीन मुलं असा हा मोठा प्रपंचाची

जबाबदारी त्यांच्यावर. त्यांनी कधी काही कमी पडू दिले नाही. चांगले संस्कार आणि शिस्तमय वातावरणात वाढवले. आप्पांना वाटायचे की मी खुप शिकावं. आप्पांनी मराठीच्या प्रेमापोटी आम्हांला सुरत(गुजरात) मधेही मराठी शाळेतच घातले. आणि सुरतमधे मराठी माध्यम फक्त ७ वी पर्यंतच होते. पुढील शिक्षणासाठी आम्हाला गावाकडे होस्टेलमधे ठेवले. पण मला होस्टेलचे वातावरणात राहणे शक्य झाले नाही. सदा आजारपणाने शिक्षण अर्धवट राहिले. त्यासाठी आज खुप पश्चाताप होतो. परिस्थितीवर मात करता यायला हवे असे शिक्षणही काळाची गरज आहे. हल्लीच्या काळात शिकुन स्वत:च्या पायावर उभे राहणे आवश्यक आहे. या अर्धवट शिक्षणामुळे १७ व्या वर्षीच लग्न झाले.

१९८६ ला पती सुरेशरावांच्या सोबत पुण्यात सासरी आले. तो काळच वेगळा होता. यांचा स्वभाव शांत, सुस्वभावी, कमी बोलणारे. पण घरची बाकीची मंडळी पुर्ण यांच्या स्वभावाविरुध्द. माझे वय लहान, माहोल वेगळा, संस्कारांचा पगडा त्यामुळे सगळ्यांना त्रास द्यायला फावलं. चारचौघी सारख मलाही संसारात सोसण, घुसमटन आल नि दाखवता न येणारे अनेक ओरखडे मनावर झाले. अर्धवट शिक्षण, स्वत:च्या पायावर सक्षम न होता आल्याने मी संपत गेली!

आणि एकदिवस मी पुन्हा जन्मली ''फिनिक्स'' पक्षासारखी! माझ्याच राखेच्या ढिगाऱ्यातुन. आयुष्याला नव्याने सुरुवात केली. सकारात्मक दृष्टीकोन ठेवून पाऊल पुढे टाकले. ठरवले, जग आपल्यासाठी बदलणार नाही. पण आपण आपल्यासाठी आपल्यात बदल करायचा. काय कमी आहे आपल्यात! हा विचार करुन खचत रडत बसण्यापेक्षा आपल्याकडे काय आहे आणि त्याचा सदुपयोग करुन आपण कसे चांगले जीवन जगु शकतो याचा विचार करायला हवा. लिहिण्या वाचण्याची आवड कामात आली. वाचन आणि सकारात्मक विचारांनी ज्ञान मिळाले तर लिहण्याणे ताण कमी होत गेला. मनाला मोकळ करण्याचे हक्काचे ठिकाण मिळालं. कागद नि लेखणी !

कथा, कविता, लेख लिहायला लागले. दिवाळी अंकात प्रकाशित होवू लागले आणि स्वत:वरचा विश्वास दृढ होवू लागला. कोण काय म्हणतय याची भीती सारुन कवी संमेलनात सहभाग घेवू लागले. २००५ ला पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आयोजित 'राज्यस्तरीय काव्यस्पर्धा' संत गाडगेबाबा स्वच्छता अभियान या विषयाच्या कवितेत उत्कृष्ट लेखन व सादरीकरणात प्रथम क्रंमाक मिळाला. अनेक दैनिकात ठळक नावासहीत बातमी आणि दुरदर्शनवर पारितोषिक स्वीकारतांनाचे हे क्षणचित्र पाहून आत्मविश्वास वाढला. कलाटणी मिळाली. पुढे या क्षेत्रात सातत्य चालु ठेवले. पुणे शहरातुन स्वत:ची एक ओळख निर्माण केली. आजही अनेक संमेलनात २००५ ची माझ्या कवितेचा व माझा उल्लेख जेव्हा लोक करतात तेव्हा अतिशय आनंद होतो. मी हिंदी, मराठी सोबत अहिराणीतुनही माझ्या कविता सादर करते आणि त्यास प्रेक्षक, श्रोतेगणांचा प्रचंड प्रतिसाद लाभला.

२००९ मध्ये मी 'शे हाई लगीननी रात' या व्हिडीओ अल्बमची निर्मिती केली. स्वप्नील बांदोडकर, राहुल शिंदे आदी गायकांनी माझ्या रचना गायले. तर सु.अभिनेत्री सरला येवलेकर, सोनिया नेगी, चेतन दळवी आदी कलाकारांवर ते चित्रित झाले.

घरच्यांची व साहित्यीक गोतावळांची साथ मिळत गेल्याने 'खान्देश अहिराणी कस्तुरी मंच' ची स्थापना केली. त्याचे उद्घाटन पद्मश्री उज्वलजी निकम साहेब यांच्या हस्ते चिंचवडच्या प्रा.रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात झाले. त्या वेळेस अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली. अध्यक्ष-डॉ.फुला बागुल सर, पद्मश्री शितल महाजन, मा.सी.आर. पाटील (खासदार सुरत), पंढरीनाथ कांबळे, योगेश महाजन (सुप्रसिध्द कालाकार ) मा.अशोक खिवसंरा(सु.उद्योजक), मा.भागवत सैंदाणे, जेष्ठ साहित्यीक सुभाष नाना अहिरे, स.निवेदक जगदीश देवपुरकर इ. मान्यवर पुण्यातील खान्देशातील अनेक साहित्यीक व प्रेक्षकांचा उदंड प्रतिसाद आणि साथ लाभली. इथुन खान्देश अहिराणी कस्तुरी मंच मार्फत एक सुंदर वाटचाल सुरु झाली.

या मंचद्वारा दरवर्षी एक शहरी व एक ग्रामीण अहिराणी साहित्य संमेलनाची आयोजन होते. २०१६ ला नाशिक येथे दोन दिवसीय 'राज्यस्तरीय खान्देश महोत्सव' चे कालीदास नाट्य मंदिरात आयोजन केले. २०१५ ला महाराष्ट्रातले पहिलं राज्यस्तरीय ग्रामीण अहिराणी साहित्य संमेलन 'पिंगळवाडे'

अमळनेर येथे घेतले. पिंगळवाडेतील ग्रामस्थ, जेष्ठ साहित्यीक प्रकाश पाटील, मा.भागवत सैंदाणे साहेब यांचा पुढाकाराने हे संमेलन अतिशय यशस्वी झाले. राज्यातील विविध भागातील साहित्यीकांनी यात सहभाग घेतला होता. उदघाटक म्हणून जेष्ठ साहित्यीक डॉ.विठ्ठल वाघ व अध्यक्षपद डॉ.संजीव कुमार सोनवणे हे होते. २०१७ ला ७ वे राज्यस्तरीय अहिराणी साहित्य संमेलनाचे उद्घाटन मा.ना.विनोद तावडे साहेब (शिक्षण व सांस्कृतिक मंत्री) यांच्या हस्ते कै.अंकुशराव लांडगे नाटयगृह, भोसरी येथे झाले. अध्यक्ष वि.दा.पिंगळे सर होते. या साहित्य संमेलनात खान्देशातील अनेक साहित्यीक व कलाकारांना व्यासपीठावर येण्याची संधी लाभली.

२०१७ ला 'अहिराणी' भाषिक कलाकारांना त्यांचे कलागुण दाखवण्यासाठी व्यवसायीक नाटकांचे आयोजन करुन चालना दिले. या माध्यमातून अनेक सामाजिक, साहित्यीक उपक्रमांचे यशस्वी आयोजन आज संपुर्ण महाराष्ट्रभर करण्याचा प्रयास चालु आहे. हे काम करत असतांना पुण्यातील अनेक मंडळींनी खुप साथ दिली. त्या सर्वांचे नाव घेणे शक्य होणार नाही. परंतु त्या सर्वांची मी मनापासुन आभार मानते व त्या सर्वांकडून प्रेरणा घेवून २०१८ ला 'सौंदर्यसम्राज्ञी' ही महाप्रतियोगीताचे संपूर्ण महाराष्ट्रात आयोजन केले आहे. ही प्रतियोगीताचे मुख्य उद्देश म्हणजे महिला-मुलींना आपल्या सुप्तकलागुणांना व्यासपीठ देणे व त्यांना या माध्यमाने पुढे येण्याची संधी देवून त्यांच्यातल्या कलागुणांना चालना देणे तसेच ही फक्त सौंदर्यस्पर्धा नाही तर आधुनिक काळाच्या धावपळीत ऱ्हास होत चाललेली भाषा, कला संस्कृतीचे संवर्धन व प्रचार प्रसार करण्यासाठी महाराष्ट्रातील सहा विभागात आयोजन केले आहे. खान्देश, पश्चिम महाराष्ट्र, कोकण, मराठवाडा आणि विदर्भ १ व २ या विभागात ही महाराष्ट्र सौंदर्यसम्राज्ञी प्रतियोगिता राबवतांना त्या त्या भागातील बोली-भाषा व तेथील कला-संस्कृतीना प्राधान्य देत आहोत जेणे करुन या निमित्ताने आपली भाषा व परिधानाचा उचीत सन्मान या व्यासपीठावर होईल.

याचप्रमाणे महिलांसाठी विविध व्यवसाय प्रशिक्षण, त्यांच्या समस्यांची निवारण करीत असतो. महिलांचा विकासाचा दृष्टीकोन ठेवून अनेक सामाजिक उपक्रमे राबवली. एडस् जनजागृती, क्षय निर्मुलन, व्यसनमुक्ती, स्वच्छता अभियान इ.

'लेकी वाचवा देश वाचवा' या अभियाना अंतर्गत राज्यातले प्रथम 'स्त्रीभ्रुण हत्या' या विषयावरचे राज्यस्तरीय साहित्य संमेलनाचे आयोजन केले. संमेलन अध्यक्षा डॉ.सुधा कांकरीया यांच्या हस्ते विविध क्षेत्रातील महिलांना 'कस्तुरी रत्न' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले व बाप-लेकी या शीर्षकाचे संपादीत काव्य संग्रहाचे प्रकाशन केले.

लोकं जुळत गेली, संघटन वाढत चाललेय. आज जे काही सामाजिक, साहित्यीक क्षेत्रात कार्य करीत आहे आणि त्यासाठी सर्वांचे स्नेह, साथ मिळतेय त्याचा मनस्वी आनंद होतो. जगण्याला अर्थ प्राप्त झाला. आज हे कार्य करत असतांना असे महिला, पुरुष भेटतात की त्यांच्याकडे पाहुन जीवनाचा अर्थ कळतो. त्यांच्यातला आदर्श व्यक्तीमत्व काम करण्यास उर्जा, प्रेरणा देतात. अशक्य काहीच नसतं. फक्त संयम ठेवून कृतीशील होवून सकारात्मक विचारांनी आयुष्याची वाटचाल चालु ठेवली तर आपल्यात काही कमी आहे याची जाणीवही होत नाही.

मी आभार मानते माझ्या आई-वडीलांचा ! त्यांनी मला हे सुंदर जग आणि संस्कार दिले. आभार मानते त्यांचे, ज्यांनी मला अडथळे अडचणी दिल्यात ! म्हणूनच मी स्वत:ला सिध्द करु शकली. स्वत:साठी !

आभार मानेन पद्मश्री उज्वलजी निकम साहेब, मा.भागवत सैंदाणे साहेब, अनुराधा धोंडगे, छाया भदाणे, मा.पंढरीनाथ कांबळे(पॅडी), बा.ह.अगदूम, रवी वारडे, डॉ.उषाताई सावंत, सारीका रंधे, शरद पाटील, पंकज निकम, बापु काकासाहेब पिंगळे असे अनेक जीवाभावाची ही माणसे प्रत्येकाचे नाव घेणे अशक्य आहे. या सर्वांनी नेहमीच प्रत्येक उपक्रमास साथ दिली. त्याचप्रमाणे माझा परिवाराचाही यात सर्वात मोठा वाटा आहे. मानमोडे साहेब, अभीदादा, रोहित, अर्पीता जे माझे मनोबल वाढवून प्रत्येक कार्यात झोकुन साथ देतात.

**शुभम टावर, प्लॉट नं.२०१,**
**सेक्टर २६निसर्ग दर्शन सो.शेजारी,**
**प्राधिकरण, निगडी,पुणे ४४**

# सावित्रीच्या लेकी...



**डॉ.शारदा शितोळे**
धुळे

कुटूंबातील शिक्षणपूरक वातावरण,उच्चशिक्षणाची आस, झालेले लग्न पीएचडी संपादनाचे प्रयत्न करतांना करावा लागणारा प्रवास, प्रवासाच्या दगदगीने झालेला गर्भपात, पीएचडी अर्धवट सोडणे, नंतर संसार, कुटूंब, मुले, नातेवाईक साऱ्या जबाबदाऱ्या सांभाळत महिला प्राध्यापक ते महिला प्राचार्य पर्यंतचा प्रवास 'दगदगीचा' असणाऱ्या डॉ. शारदा शितोळे यांचा शैक्षणिक आलेख उंचावणारा आहे. तसेच त्या सायकलींग करणाऱ्या सुपर इंडोनियर महिला ठरल्या आहेत. सध्या त्या एच.आर.पटेल महिला महाविद्यालय शिरपूर जि.धुळे येथे प्राचार्य पदावर कार्यरत असून पुरूषी वर्चस्ववादाचा कटू अनुभव आलेल्या डॉ.शितोळे यांनी महिला शक्तीची चुणूक दाखवून देतात.

जन्म दि.१२ मार्च १९६४ रोजी धुळे येथे झाला. १२ वी पर्यंतचे शिक्षण अनुक्रमे जयहिंद बालमंदिर, जयहिंद मराठी शाळा व जयहिंद हायस्कुल धुळे येथे झाले. बी.एस.सी.धुळे येथील एस.एस.व्ही.पी.एस.महाविद्यालयात, एम.एस.सी.पुणे येथील फर्ग्युसन महाविद्यालयात तर पीएच.डी.पदवी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगांव येथून प्राप्त केली. बालपणापासून घरातूनच शिक्षणाला अनुकूल वातावरण मिळाले. वडील प्रा.डॉ.भीमराव शामराव शिसोदे यांनी धुळे येथील एस.एस.व्ही.पी.एस.आर्टस् महाविद्यालयात हिंदीचे अध्यापनाच कार्य केल, तर आई सौ. मीना भीमराव शिसोदे, जयहिंद मराठी शाळा येथील 'प्रथम शिक्षिका' आदर्श शिक्षिका पुरस्काराने सन्मानित, नंतर १७ वर्ष मुख्याध्यापक व त्यानंतर धुळे येथील जयहिंद शैक्षणिक ट्रस्टच्या सन्माननीय संचालक पदाची धुरा यशस्वीपणे सांभाळली. वडिल प्राध्यापक असतानाच वाचनाची व लिखाणाची आवड, त्यामुळे निवृत्तीनंतर त्यांनी गीतेचा मराठीत अनुवाद, शिवचरित्रावरील पुस्तकांचही लिखाण केलं, आम्ही दोन बहिणी आणि दोन भाऊ परंतु आईवडीलांनी मुलगा, मुलगी असा भेद कधी केला नाही. सगळ्यांना शैक्षणिक प्रगतीसाठी कायम प्रोत्साहन दिलं, आपली मतं कधीच आमच्यावर लादली नाहीत. बालपण फार छान गेलं!

फर्ग्युसन कॉलेजमधून एम.एस्सी.झाल्याबरोबर विवाह झाला. यजमान श्री.जयंतराव भाऊराव पाटील, कासोदे येथील रहिवासी. लग्नानंतर डोंबिवली, ठाणे येथे वर्षभर कनिष्ठ महाविद्यालयात अध्यापनाचे कार्य केल्यानंतर २० जुलै १९८९ ला धुळे येथील जयहिंद महाविद्यालयात सेवेसाठी रूजू झाले. त्यानंतर पीएच.डी.पदवी संपादन करण्याचे वेध लागले. त्यासाठी प्रताप महाविद्यालय अमळनेर येथील डॉ.ए.जी.सराफ यांच्या मार्गदर्शनाखाली पीएच.डी.च काम सुरू केलं, परंतु महाविद्यालयातलं काम, अमळनेरला ये-जा करताना होणारी दगदग यामुळे दिवस राहून गर्भपात झाला. पुन्हा दिवस राहिले, डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार पीएच.डी. काम अर्धवटच सोडावं लागलं. २१ मे १९९३ ला चि.अमेयचा जन्म सिझेरीयनने सुखरूप झाला. बाळ हळूहळू मोठा होत होता. ३ वर्षाचा झाला, आणि चि.आदित्याचा जन्म दि. ०८ जुलै १९९६ रोजी पुन्हा सिझेरीयनेच झाला. दरम्यान पदोन्नतीसाठी करावे लागणारे रीफ्रेशस कोर्सेस करत राहिले. पण मनाच्या कुठल्याश्या कोपऱ्यात दडलेली पी.एच.डी. पूर्ण करण्याची आसकाही स्वस्थ बसू देईना! दरम्यानच्या कालावधीत विद्यापीठाचं पत्र आल की, तुम्हाला मार्गदर्शक म्हणून डॉ.के.बी.सराफ यांची नव्याने नियुक्ती करण्यात आली आहे. मनात इच्छा होतीच सरांशी संपर्क साधला. पी.एच.डी. काम नव्यानं सुरू केलं. सुदैवाने यु.जी.सी.च्या फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रामच्या अंतर्गत डॉ.के.बी.पाटील प्राचार्य असतांना पावणे दोन व वर्षांची रजा मंजूर झाली. आणि मग मला माझ्या संशोधनाच्या कामावर लक्ष केंद्रित करण शक्य झालं. सकाळी घरातल सगळ व्यवस्थापन केलं, की एस.टी.बसने अमळनेरला जाणे, दिवस भर प्रताप महाविद्यालय, अमळनेर येथे काम करायचं,

संध्याकाळी पुन्हा बसने धुळ्याला परत घरी दोन लहान मुलं, येणारे-जाणारे, सासू-सासरे, दिरं, नणंदा, भाचे अशा घरातल्या जबाबदाऱ्या सांभाळत मिळालेल्या कालावधीत रात्रीचाही दिवस करून निदान सगळा डाटा गोळा झाला.

माझे पती श्री.जयंतराव पाटील. एस.एस.व्ही.पी.एस. संस्थेच्या इंजिनियरींग कॉलेजला अध्यापनाच कार्य करत होते. त्यांनी आय.आय.टी खरगपूरहून एम.टेक(कॉम्प्युटर सायन्स) पदवी प्राप्त केली. त्यांची सन २००० मध्ये शिरपूर येथे नव्यानेच सुरू झालेले आर.सी.पटेल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, शिरपूर येथे प्राचार्यपदी नियुक्ती झाली. घटना खूपच चांगली होती. परंतु आधीच असलेल्या धावपळीत, मोठ्या प्रमाणात भर टाकणारी होती. त्यांचा सकाळचा टिफीन तयार करून दिला की मग ते सकाळी ८.३० ते ९.०० च्या सुमारास एस.टीने शिरपूरला जात. नवीन जॉब, अनेक आव्हान होती. त्यामुळे घरी परतण्याची वेळ कधीच नक्की नसायची. अशा परिस्थितीतही वेळ मिळेल तस काम चालू ठेवल! डाटा ॲनालिसिस करत होते. नंतर घरी संगणक, प्रिंटर सगळ घेऊन टाकलं, मुल झोपली की, दोघेही कॉम्प्युटर बसून थिसीस टाईप करत असू. सकाळ उजाडून जात असे तसेच उठून ते शिरपूरला आणि मी अमळनेरला जात असू. मुलांकडे बघण्यासाठी म्हणून खूप चांगली व्यक्ती मिळाली होती. आजी वयस्कर होत्या पण मुलांशी खुप प्रेमान वागत. त्यामुळे गेल्यावर चित्त मुलांमध्ये असायच पण आजी मुलांची अजिबात आबाळ करणार नाहीत याची खात्री होती. अखेर जानेवारी २००२ मध्ये माझी रजा संपली आणि मी पुन्हा नोकरीवर रूजू झाले. प्रबंध लिहिण्याच काम सुरूच होत आणि कॉलेजमधला अध्यापनासकट इतर सगळ्या जबाबदाऱ्याही होत्या. अखेर नोव्हेंबर २००२ ला पी.एच.डी.चा प्रबंध विद्यापीठाकडे सुपूर्द केला. दि.८ मे २००३ ला पी.एच.डी.ची तोंडी परीक्षा झाली आणि यथावकाश पदवी मिळाल्याच नोटीफिकेशनही मिळालं. अतिशय कष्टानं मिळावलेली पदवी, त्यासाठी माझे यजमान श्री. जयंतराव भाऊराव पाटील याचे सहकार्य, महाविद्यालयाने दिलेली रजा, यामुळे ते शक्य झालं.

त्यानंतर मात्र मी माझी मुलं, घर आणि कॉलेज यासाठी स्वत:ला अक्षरश: वाहून घेतलं. दोघही मुलं जयहिंद शाळेत शिकत होती, अभ्यासात आणि इतरही क्षेत्रात चांगली प्रगती करत होती. यजमानाचं कॉलेजच काम वाढल होत. कॉलेज चांगल नावारूपाला येत होत. दरम्यान महाविद्यालयास अमेरिकेतील फोर्ड फाऊंडेशन कडून 'कॅम्पस डायव्हर्सिटी इनिशियेटीव्ह' हा प्रोजेक्ट मिळाला. अनेक नवीन उपक्रम सरु झाले. या उपक्रमांच्या माध्यमातून शैक्षणिक कार्य करतांनाच, विद्यार्थ्यांना चांगले नागरिक घडविण्यासाठी, व्यावहारिक ज्ञान संपादन करण्यासाठी व त्यांच्या एकुणच सर्वांगीण विकास करण्यासाठी म्हणून विविध उपक्रम राबविण्याची चांगली संधी मिळाली. मिळालेल्या संधीमुळे आत्मविश्वास वाढला.

त्यावेळी जयहिंद महाविद्यालयात महिला प्राध्यापक म्हणून कार्यरत आहोत असा विचारही कधी मनात आला नाही. कधी तशा सवलतीही मागितल्या नाहीत. जबाबदारी मिळण्यासाठी म्हणूनही स्त्री-पुरूष असा कधी भेदभाव नव्हता. संधीच सोन करत, प्रत्येक कामात स्वत:ला सिद्ध करत गेले. आपण महिला आहोत म्हणून आपल्याला हे शक्य नाही, असा साधा विचारही मनात आला नाही! त्याचं कारण कदाचित महाविद्यालयात तयार झालेल वातावरण असेल! महिला प्राध्यापकांना अतिशय सन्मानाने वागविले जाण्याचा तो कालावधी होता. कला मंडळाची जबाबदारी मिळत राहिली तरं चांगल्या विद्यार्थ्यांची निवड करता यावी म्हणून मी शास्त्रीय, सुगम गायनही शिकले. शास्त्रीय गायनाची विषारद आणि सुगम गायनाची उपांत्य विषारद पदवी प्राप्त केली. राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी, कला मंडळ समन्वयक असतांना महाविद्यालयाला उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव आयोजित 'युवारंग' ची जनरल चॅम्पियनशीप मिळविली आणि सातत्यपूर्ण दरवर्षी युवारंग, कलाविष्कारातून जयहिंद महाविद्यालयाची पताका फडकवत ठेवली. वादविवाद, वक्तृत्व, व्याख्यानमाला, वर्कशॉप ॲण्ड ओरीएंटेशन, विद्यार्थी-पालक शिक्षक समिती, विद्यापीठस्तरीय अविष्कार स्पर्धा, युवती सभा, वूमन एम्पॉवरमेंट कोर्स इ. एक नव्हे तर अनेक समित्यांचे

कधी सदस्य तर कधी समन्वयक म्हणून काम पाहिले.

मला याच आश्चर्य वाटतं, विद्यार्थ्यांमध्ये अतिशय प्रिय, सगळे उपक्रम समर्थपणे पार पाडूनही सन २००६ मध्ये एका महाविद्यालयाच्या प्राचार्य पदासाठी जेव्हा अर्ज केला, तेव्हा मुलाखतीदरम्यान तुम्ही महिला आहात तर तुम्हाला ही जबाबदारी पेलवेल का? असा प्रश्न विचारून तो प्रश्नच निकाली काढला गेला. महिला असतांना, कुठलही पद नसतांना खूप जबाबदाऱ्या आपण पार पाडू शकतो, पण प्राचार्यपद हे मात्र महिलेला मिळणार नाही हे अतिशय विदारक सत्य समोर आल! बारावीत ८९.६% मार्कस मिळवूनही, सारखे गुण असतांना टाय ब्रेकमध्ये केवळ दहावीत एक मार्क जास्त म्हणून दुसऱ्या मुलाला बी.जे.मेडीकलला प्रवेश मिळाला आणि डॉक्टर बनून समाजासाठी कार्य करण्याच स्वप्न धुळीला मिळाल होत, पण त्यावेळी माझे प्रयत्न अपुरे होते. यावेळी मात्र मी कुठलीच कसर न ठेवता प्रचंड मेहनत करूनही केवळ महिला म्हणून नाकारले गेल्याने उद्वीग्न व्हायला झालं!

नंतरचा ५ वर्षांचा काळ खुपच खडतर होता. संस्थेच्या दर ५वर्षांनी निवडणूका होतात. २०११ मध्ये नवीन मॅनेजमेट सत्तेत आलं. त्यांनी उपप्राचार्य पद दिलं. विभागप्रमुखाची जबाबदारीही सोपवली. अतिशय प्रतिकुल परिस्थितीत अविष्कार, युथफेस्टीवल, महाराष्ट्र शासनाचा 'जागर जाणीवांचा' या प्रकल्पात सन्मानचिन्ह व १ लाख रू. पारितोषिक, स्नेहसमेलन, करीयर ॲण्ड प्लेसमेंट सेलच्या अंतर्गत, समाधानकारक काम करता आलं. ईलेक्ट्रॉनिक्स विभागासाठी ६ ते ७ लाखांची उपकरण खरेदी करून, प्रयोगशाळेला समृद्ध करता आलं. दरम्यान जयंवतरावांना संगणकशास्त्र विषयातील पीएच.डी.पदवी मिळाली व उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगांवच्या अभियांत्रिकी शाखेचे डीन म्हणूनही नियुक्ती झाली.

अमेरीका, इंडोनेशिया देशांमध्ये शोध-निबंध सादरीकरण, जवळ जवळ ५० राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय चर्चासत्रांमध्ये सहभाग, ५० पेक्षा अधिक शोध-निबंध राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय रिसर्च जर्नल्स् मध्ये प्रसिद्ध, ४ पुस्तकांचे पब्लिकेशन, २ शोधनिबंधांना सर्वोत्कृष्ट सादरीकरण पुरस्कार, एक विद्यार्थ्यास पीएच.डी.पदवीप्राप्त, चीन, सिंगापूर, हाँगकाँग, मकाऊ, ऑस्ट्रेलिया, स्लोवाकीया, हंगेरी, स्वित्झंलंड या देशांना भेटी, असा एकुण शैक्षणिक आलेख उंचावत असतांनाच दि.५ डिसेंबर २०१७ रोजी शिरपूर एज्युकेशन सोसायटी संचलित श्रीमती एच.आर.पटेल कला महिला महाविद्यालयात प्राचार्य पदी नियुक्ती झाली. कॉलेज लहान आहे. पण आव्हानही आहेत. मुलींची संख्या वाढविणे, आजूबाजूच्या खेड्यातून येणाऱ्या मुलींच्या उज्वल भविष्यासाठी शैक्षणिक आणि सर्वांगिण विकासासाठी विविध उपक्रम राबविणे, महाविद्यालयात सायन्सची शाखा सुरू करणे, स्वतंत्र इमारतीत महाविद्यालय स्थलांतरीत करणे इ. परंतु समाधानाची बाब ही आहे की, संस्थेचे अध्यक्ष माजी शालेय शिक्षण मंत्री आदरणीय श्री.अमरीशभाई पटेल, श्री. भुपेशभाई पटेल, श्री. राजगोपालजी भंडारी, माजी कुलगुरू डॉ.के.बी.पाटील यांच्या सहकार्याने आणि मार्गदर्शनाने ही सगळी आव्हाने पेलता येणार आहेत!

आरोग्यासाठी साधारणत: एक वर्षापूर्वी सायकलिंग करायला सुरूवात केली. एकाच कॅलेंडर वर्षात अनुक्रमे २००,३००,४०० आणि ६०० कि.मी.सायकलिंग करून ऑडॅक्स, फ्रान्स या संस्थेचा अतिशय मानाचा 'सुपर इंडोनियर' हा सन्मान उभयतांनी प्राप्त केला.

चांगल्या क्षेत्रात काम करता येतय याबद्दल आनंद आणि समाधानही आहे. आई-वडील भाऊ विवेक शिसोदे, दिपक शिसोदे, बहिण विद्या शिंदे, माझे पती प्राचार्य डॉ.जे.बी.पाटील, मुलं चि.अमेय आणि चि. आदित्य याच सगळ्याचं सहकार्य, यामुळे खूप चांगल काम करू शकले आणि करू शकेन. एक महिला जेव्हा कुठल्याही क्षेत्रात कार्य करते, तेव्हा करायच म्हणून करायच, नोकरी आहे म्हणून काम करायच असा अविर्भाव न ठेवता त्या कामात स्वत:ला पूर्णपणे झोकून दिल तर, स्वत:ला सिद्ध तर करता येतच पण आपण स्वत: कुटूंब, समाज, राज्य, देश यासाठी सुद्धा चांगल कार्य करून सन्मानास प्राप्त ठरू शकतो. अनेकांच आयुष्य आपण

घडवू शकतो! माझ्या आईने कुटुंबाबरोबर इतर इतक्या मुलांचे व त्यांच्या पालकांचे प्रेम मिळवले, निस्सीम स्नेह मिळवला, ते तिने केलेल्या अविरत परिश्रम, कामामुळे ! तिचा आदर्श समोर होता. आपलाही आदर्श कुणीतरी घ्यावा, असा आदर्श तिने मला स्वत:च्या रूपाने घालून दिला! समाधानाची बाब अशी आहे की, महिलांसाठी सामाजिक परिस्थिती कासवाच्या गतीने का होईना बदलते आहे. स्त्री-भ्रूण हत्या, हुंडाबळी, बलात्कार, स्त्रियांचे समाजातील दुय्यम स्थान, स्त्रीयांवरचे अन्याय, अत्याचार या अतिशय गंभीर प्रश्नाचं तांडव समाजात बघतो आहोत तर दुसऱ्या बाजूला पालकांच्या मानसिकतेतील बदलही आपण बघतोय. मुली शिकत आहेत. वेगवेगळ्या क्षेत्रात प्रगती करताहेत. विविध क्षेत्रांमध्ये नोकरी, व्यवसायात पुरूषांच्या खांद्याला खांदा दुहेरी जबाबदारी यशस्वीपणे पेलत आहे. नारी अबला आहे. ह्या शतकांच्या मानसिकतेला छेद देत आहेत विधात्याने नारीला नवनिर्मितीची एव्हढी आव्हानात्मक जबाबदारी दिलेली आहे! मुळात 'स्त्री' त्वाच्या सर्व जबाबदाऱ्या यशस्वीपणे पार पाडतांना 'स्व' त्वाचा शोध ही घ्यावा, सगळ्यांसाठी जगतांना 'स्व' च्या पूर्ततेसाठी काही वेळ देऊन मिळालेल्या स्त्री जन्माचे आनंदयात्री व्हावे असे मनोमन वाटते. या आनंदयात्रेसाठी सर्व वाचक भगिनींना मन:पूर्वक शुभेच्छा !

पत्ता :- प्राचार्या, एच.आर.पटेल महिला
महाविद्यालय, शिरपूर जि.धुळे



जागतिक महिला दिनाच्या हार्दिक शुभेच्छा !

सप्तश्रृंगी बहुउद्देशीय महिला संस्था धुळे

रजि.नं.एफ/७३१६४महाराष्ट्र ७६३७/२००६ धुळे संचलित

-आमचं एकच ध्येय -

समाजातील निराधार महिलांना सक्षम बनवून आर्थिक व सामाजिकदृष्ट्या सबख बनविणे

वैष्णवी गृहउद्योग



मीना भोसले

अस्सल खान्देशी स्वाद

आमच्या येथे उडीद पापड,नागली पापड, लोणचे, शेवया, वेफर्स, गरम मसाला, चहा मसाला, मिरची, हळद, धने, चकल्या, तिळचिक्की व सर्व प्रकारचे रेडिमेड पीठ (आटा) इ.वस्तू ऑर्डरप्रमाणे घरपोच मिळतील. ते पण वाजवी किंमतीत.

संपर्क - ०२५६२-२७५०६७
मोबा.९६५७८२५९६३/९२०९४०८०६७

खापरावरची पुरणपोळी आमच्याकडे योग्य दरात मिळेल.

पत्ता:- ५१, सप्तश्रृंगीनगर,आकाशवाणी केंद्राच्या मागे, ओमनगरजवळ, विद्यानगरी, वलवाडी शिवार,देवपूर,धुळे-४२४००५.

# सावित्रीच्या लेकी...



**डॉ.संगिता म्हसकर**
जळगांव
चलभाष ०९८२३७७६९७१

**गद्य लेख, ललित, कविता, गझल अशा लेखनात मुशाफिरी करित बालपणापासून झालेला संगीत संस्काराचा धागा पकडून ठेवत गझल अल्बमसह लेखनाचा प्रपंच संगीता म्हसकर राखून आहेत. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या पदव्युत्तर संगीत विभागाची पायाभरणी, 'खानदेशच्या सांगितीक वाटचाली'या विषयातील पीएचडी या कार्यातून संगीत क्षेत्रातील कामगिरी उल्लेखनीय ठरते. मात्र नोकरी करीत असतांना पुरुषी वर्चस्ववादाचा कटू अनुभवाला तोंड देत सामोरे जाणाऱ्या संगीता म्हसकर ह्या विविधरंगी क्षणांच्या कोलाजाला आयुष्य मानतात.**

महिला दिनाच्या निमित्ताने आज स्वत:च्या आयुष्या कडे तटस्थपणे बघण्याची संधी मिळते आहे.कितीतरी आठवणी मनात आहेत.काही निसटलेली स्वप्नं आहेत.काही सल..तर काही समाधानाचे क्षण आहेत.विविधरंगी क्षणांचा कोलाज हेच तर आयुष्य !

माझे वडील प्रा.एन. व्ही पटवारी हे तत्त्वज्ञान आणि मानसशास्त्र या विषयांचे प्राध्यापक ! शिवाय शास्त्रीय संगीत तज्ज्ञ आणि गायक.घरी सतत होणाऱ्या गाण्याच्या मैफिली; त्यानिमित्ताने येणारे अनेक कलाकार; वडिलांच्या सर्वत्र होणाऱ्या मैफिली अशा सांगितीक वातावरणात वाढल्यामुळे गाणं माझ्या आयुष्यात येणं, स्वाभाविक च होतं.वयाच्या ७ व्या वर्षांपासून मी गाण्याच्या स्पर्धांमधे बक्षिसं मिळवत होते.साधारण सतराव्या वर्षांपासून मी स्वतंत्र मैफिली करायला सुरुवात केली.

आम्ही भुसावळ ला राहायचो.आमच्या घरात आम्ही चार बहिणी.!.मी तिसरी !

आई बाबांना मुलाचा विलक्षण ध्यास होता.अर्थातच तिसऱ्यांदा झालेला मुलीचा म्हणजे माझा जन्म फारसा आनंददायी नव्हता हे ओघाने आलंच . भुसावळ मधे गाण्याला फार अनुकूल वातावरण नव्हतं.व्यावसायिक संधी नव्हती.शिवाय त्या काळात आजच्या सारखी यु ट्युब किंवा फेसबुक या सारखी माध्यमं देखिल नव्हती.गाण्याने माझं आयुष्य व्यापून टाकलं होतं पण पुढे जाण्यासाठी मार्ग दिसत नव्हता.

कदाचित या अस्वस्थतेतूनच मी लिखाणाकडे वळले असावे.विविध विषयांवर गद्य लेखन, कविता, सूत्रसंचालन अशा लिखाणात मला खूप आनंद मिळायचा.वृत्तपत्रात कविता छापून आल्या की लिखाणात अजून हुरुप यायचा . आकाशवाणीच्या युवा वाणी विभागात निर्मिती सहायक म्हणून काम करताना ही लिखाणाचा छान अनुभव आला.राज्यशास्त्र आणि संगीत अशा दोन्ही विषयांत मी पोस्ट ग्रॅज्युएशन केलं होतं त्यामुळे अनेक महाविद्यालयांमध्ये देखिल मी काम केलं.

याच दरम्यान सुप्रसिद्ध संगीतकार मा.अशोक पत्की यांच्या संगीत दिग्दर्शनात एक गाणं गायची संधी मला मिळाली. अशोकजीं नव्या कलाकारांना प्रोत्साहन देणारे.मलाही त्यांनी खूप सहकार्य केलं.मुंबईला काही दिवस तरी राहाण्याबद्दल सुचवलं.मात्र घरातून सहकार्य न मिळाल्याने मी जाऊ शकले नाही.आज ही ती रुखरुख मनात आहे.

दरम्यान जळगाव ला राहाणाऱ्या डॉ. श्रीकांत म्हसकर यांच्या सोबत माझा प्रेमविवाह झाला.दोघांची क्षेत्र वेगळी असल्याने काही काळ गाण्यात खंड पडला पण गाणं माझ्यापासून दूर गेलं नाही.सूर आणि शब्द यांची सोबत आयुष्यांत नेहमी कायम राहिली. तर अनुराग या माझ्या गोड बाळाच्या जन्माने आयुष्यात कृतार्थता निर्माण झाली.

अनुराग

लहान असताना मला फार वेळ घराबाहेर राहाणं शक्य होत नसे.या काळात मी पुन्हा लिखाणाकडे लक्ष केंद्रित केलं.

खानदेशाची सांगितीक वाटचालया विषयात एस एन डी टी

विद्यापीठातून पीएच डी ची पदवी प्राप्त केली.या प्रबंधाला जिल्हा मराठा विद्या प्रसारक मंडळ अहमदनगर या संस्थेचा राज्य स्तरीय पुरस्कार मिळाला.

जळगाव च्या उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या पदव्युत्तर संगीत विभागाची उभारणी मी या काळात केली.

दुर्दैवाने या विभागात मला समाजातील पुरूषी वर्चस्ववादाचा अतिशय कटू अनुभव आला.

अर्थात विद्यापीठ सोडल्यानंतर मी इतर संस्थांमध्ये गाणं शिकवत होते.

लिखाणाचे अनेक प्रोजेक्ट समोर होते.वृत्तपत्रात लिखाण करत असताना विविध मालिका लिहील्या.

श्वासातले तराणे (गझलसंग्रह) राजूचा रोबो (बालनाट्य) इ पुस्तकं प्रकाशित झाली.

अगदी सुरुवाती पासूनच मला छंदबध्द कविता आवडायची.माझ्या कविता छापून येण्यापेक्षा त्या गायल्या जाव्या असं मला वाटायचं.

या अनिवार इच्छेतून च मी माझ्या गझलांचा माझ्या आवाजातकधी फुलांत रंगलेहा अल्बम तयार केला.

युनिव्हर्सल म्युझिक कंपनी ने हा अल्बम लॉन्च केला.या सगळ्याच गोष्टींमध्ये पती डॉ श्रीकांत यांनी खूप सहकार्य केलं .

भविष्यात अजून बरेच प्रोजेक्ट करायचे आहेत.'गझलगायकी'या विषयावर पुस्तक लिहीणं सध्या सुरू आहे.दै.लोकमत साठी पूर्वी संगीत विषयक मालिका लिहीली होती.त्या मालिकेचं पुस्तक रूपांतर त्याचप्रमाणे ललित लेख संग्रह आणि अर्थातच गाण्याचे अल्बम..

आज मला एवढंच म्हणावसं वाटतं की सगळ्याच गोष्टी आपल्या हातात नसतात.

मात्र आपली स्वप्न पूर्ण करण्यासाठी दुसऱ्या कोणाचीही वाट बघण्यात अर्थ नसतो.

ज्या वाटेने चालत आहोत त्या वाटेवर फुलं आपण च अंथरायची आणि स्वतासोबत इतरांच्या आयुष्यात ही सुगंध निर्माण करायचा, हाच स्त्री जीवनाचा अर्थ असावा.. !!

**पत्ता- रामबाग कॉलनी, प्लॉट नं.७**
**आय.एम.आर.कॉलेजरोड,जळगांव.**

-----------------------------------------


**सावित्रीच्या लेकी विशेषांकास हार्दिक शुभेच्छा !**

**THE NEW INDIA ASSURANCE COMPANY LTD.**
(Wholly owned by the Govt. of India)

**मोटार वाहनांचा विमा**
**खाजगी कार | दुचाकी | मालवाहतूक गाड्या**

**मेडीक्लेम विमा**

**संपर्क क्रं.९८५०२५९६९७**



**प्रमोद नाना पाटील**
**विमा सल्लागार,**
**एल.आय.सी.भारतीय आयुर्विमा महामंडळ,शिरपूर**

*Leadership and beyond*
**दि न्यू इन्डिया एश्योरन्स कंपनी लिमिटेड**
**The New India Assurance Co. Ltd**
India's Premier Multinational General Insurance Company
*Wholly owned by Government of India*

# सावित्रीच्या लेकी...



**सिमा तुषार रंधे**

शिरपूर,
चलभाष ९४२१८८४२२२

जिल्हा परिषद सदस्या, सरपंच अशा राजकीय भुमिका यशस्वीरित्या सांभाळत, यातून समाजविकासातील महिलांसाठी अग्रक्रम देत विविध सामाजिक कार्यक्रम घडवून आणणाऱ्या सिमा रंधे ह्या थोर स्वातंत्र्य सैनिक कर्मवीर स्व.व्यंकटराव रणधीर यांच्या घराण्याचा समाजकार्याचा वसा जपताहेत. बोराडी या आदीवासी गावातील महिला शालेय विद्यार्थीनी, किशोरवयीन मुली यांच्यासाठी विविध कार्यक्रम घडवून आणणाऱ्या सिमा रंधे यांना संस्कार प्रतिष्ठाण पुणे यांच्यावतीने स्वामी विवेकानंद समाजरत्न पुरस्कार देऊन गौरवण्यात आले आहे.



सर्वसामान्य परिवारात माझा जन्म झाला. बालपणापासुन शिक्षणाची विशेष आवड होती. आई वडीलांचा कल माझ्या विषयी सकारात्मकच होता. बालपणी आईने दिलेल्या आदर्श संस्कारातून चांगल्या सवयीसोबत पदवी पर्यतचे शिक्षण हालाखीत नाही पण कष्टाने व जिद्दीने पुर्ण केले. यात वडीलांचा सहभाग आहे. पण आईचाही सिंहाचा वाटा आहे.अतिशय कष्टातुन वेळात वेळ काढून मला आईने मार्गदर्शन केले. माझे बालपण गुजरातमध्ये (आहवाडांग वापी) जरी गेले असले तरी विवाहानंतर वैवाहिक जीवन महाराष्ट्र राज्यातील थोर स्वातंत्र्य सैनिक शिरपूर तालुक्याचे माजी आमदार व शिक्षण महर्षी, कर्मवीर स्व.अण्णासो. व्यंकटरावजी तानाजी रणधीर यांचे नातू आणि महाराष्ट्र शासनाने ज्यांना छत्रपती क्रिडा पुरस्काराने सन्मानित केले ते स्व.दादासाहेब विश्वासराव व्यंकटराव रंधे यांचे जेष्ठ सुपूत्र व किसान विद्या प्रसारक संस्था, शिरपूर जि.धुळे चे विद्यमान अध्यक्ष श्री.भाऊसो.तुषार विश्वासराव रंधे यांचे सह अतिशय आनंदाने मार्गक्रमण करीत आहे व जात आहे.

बालपणापासून सामाजिक क्षेत्रातील अडी अडचणी दुर करण्यासाठीचे मनातील विचार, विवाहानंतर मला आदर्श घर व घराणे मिळाल्यामुळे तसेच परिवर्तनवादी व सामाजिक जाणीवेने

पेटून उठलेल्या व पुरोगामी विचारातील घराण्यामुळे व घरामुळे मला त्याअडचणी सोडविण्यास अधिकच अनुकूल परिस्थिती मिळाली. म्हणून मी सामाजिक राजकीय, कौटूंबिक क्षेत्रात तसेच शैक्षणिक क्षेत्रातही चांगल्या पध्दतीने मी माझे काम आवडीने करु शकते याचा मला अभिमानही आहे. या कामांसाठी मी माझ्या वैयक्तिक व कौटूंबिक जबाबदाऱ्या सांभाळुन भरपूर वेळही देवू शकते यात माझा किती सिंहाचा वाटा आहे हे मला सांगता येणार नाही पण ज्यांनी मला घरातुन ही संधी दिली त्यांचा यात नक्कीच सिंहाचा वाटा आहे यात मात्र शंका नाही.

सामाजिक कार्य करीत असतांना लेक वाचवा व लेक शिकवा या अभियाना अंतर्गत मेळावे आयोजित केले. प्रदर्शन भरवली एक पात्री प्रयोग व पथनाट्य केले. पोष्टर मोहिम राबवली, गुणवत्ता धारक मुलींचा गौरव केला. ज्या महिलांना एक किंवा दोन मुलीच असतील त्यांना आर्थिक मदतीची गरज असेल. अशा पालक महिलांना पदरमोड करुन आर्थिक मदत केली. मुलींच्या जन्माचे स्वागत केले व त्यासाठी दवाखान्यातही गेले. ३ जानेवारी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुलेंचा जन्म दिन बालिका दिन म्हणून साजरी केला. अंगणवाडी, बचतगट आशा कार्यकर्ती, जि.प.शिक्षीका, आरोग्य सेविका, नगर पालिका, एस.टी.महामंडळ यात चांगल्या प्रकारे काम करणाऱ्या १२ महिलांचा सहभाग असतो त्यांनाही ८ मार्च रोजी सन्मानित करण्याचा प्रयत्न केला.

स्वच्छता आणि पर्यावरणासाठीही त्यावर आधारीत असे निबंध व चित्रकला स्पर्धा आयोजित करुन किसान विद्या प्रसारक संस्थेच्या माध्यमातून गुणवत्ता धारकांचे कौतुक केले. यात पर्यावरण व वृक्षारोपण यासाठी सुध्दा प्रकल्प राबविले. वातावरण निर्मिती करुन वृक्ष दिंडी, वृक्ष पालखी काढणे, शौचालयाचा वापर करणे इ. साठी जनजागरणाचे कार्यक्रम हाती घेतले आहेत.

हळदी कुंकू समारंभाचे निमित्त साधून महिलांच्या आरोग्यासाठी व्याख्यानमालेचे आयोजन केले. दि.२५/१/२०१७ रोजी जायन्टस् ग्रृप लक्षसखी तर्फे शिरपूर शहरात अंबिका नगर व तरण तारण मंदिर जवळील परिसरात महिलांच्या आरोग्यासाठी तसेच स्वच्छतेविषयी व अंधश्रध्देविरुध्द पुरावे मांडून व्याख्याने घेतली. यासाठी महिला मार्गदर्शिका डॉ.जयश्री निकम यांनी मार्गदर्शन केले.

बोराडी येथे येथे फुलामाय गुजर वसतीगृहात महिला वाढदिवस कार्यक्रम आयोजित करुन मुलींसाठी व मुलींच्या मातांसाठी आरोग्य विषयक मार्गदर्शन केले. त्यासाठी तज्ञ महिला वैद्यकीय अधिकारी यांना आग्रहाने बोलाविले.

स्त्रीयांसाठी नवरात्रीचे नवरात्र निमित्त साधून दांडीया स्पर्धाचे आयोजन केले. महिलांसाठी विशेष कार्यक्रम करत असतांना नाताळ(ख्रिसमस) निमित्त साधून दि. २५/१२/२०१६ रोजी शिरपूर शहरालगत असलेले विश्वमंडळ सेवासदन आदिवासी विद्यार्थी व विद्यार्थीनींसाठी सर्वधर्मीय प्रार्थना घेतली. या कार्यक्रमास शिरपूर तालुक्याचे आमदार दादासाहेब काशिरामजी पावरा व विश्वमंडळातील सर्व सदस्य उपस्थित होते.

कार्यरत क्षेत्रातील वाटचाल करीत असतांना कमी अधिक प्रमाणात अडचणी येतात. पण ती संकटे आहेत किंवा मोठे अडसर आहेत असे मला वाटत नाही. त्यातून मार्ग काढणे यात मला अधिक आनंद आहे. अडचणी- उदा.कधी कधी व्याख्याने आयोजित केल्यानंतर महिलांची संख्या नगण्य असते पण सातत्याने पाठपुरावा केला तर महिलांची उपस्थिती अधिक असते यात सातत्य महत्वाचं आहे.

महिला म्हणून काम करत असतांना वैयक्तिक जीवनाकडे दुर्लक्ष होणार नाही याचीही काळजी घेणे आवश्यक आहे. यात आपल्यावर असलेली कौटूंबिक जबाबदारी, मुलांचे शिक्षण, घरातील वडीलधाऱ्या माणसांची सेवा यातही आपले कडून दुर्लक्ष होता कामा नये. सामाजिक काम करत असतांना घरातील व परिवारातील सर्वांची मने कशी सांभाळली जातील याकडेही लक्ष देणे महत्वाचे आहे. महिला म्हणून काम करत असतांना आलेले अनुभव अतिशय आनंददायी वाटतात. मनाचे समाधान होते. आपण सार्वजनिक हिताची कामे केली तर प्रसंगी आपली प्रसंशाही होते.

या कार्यक्षेत्रात सगळ्यात आठवणीचा प्रसंग म्हणजे महिलांच्या

आरोग्य विषयक शिबीरात महिलांच्या मनामध्ये असलेली भिती व न्यूनगंड दूर सारत सुरुवातीला मोकळ्या मनाने आपल्या मनातील शंका-कुशंका सांगु शकतात . तसेच ज्या गुणवत्ताधारक मुलींचा सत्कार केला जातो. अशा प्रसंगी पालक माताही भारावून जातात. हे प्रसंग न विसरण्यासारखेच आहेत.

हे क्षेत्र मी सामाजिक जाणीवेतून निवडले आहे. दिनदलीत, पददलीत, आर्थिक दुर्बल व सर्वसामान्य परविरातील घटकांसाठी आपण काम करावे असे मनांपासून वाटते. ज्यांची आर्थिक स्थिती कमकुवत आहे त्यांना नेहमीच मदतीचा हात दिला. यासाठी मला प्रेरणा मिळाली ती साहित्यातून ! क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे जीवनचरित्र वाचनातुन समजले. त्यांनी स्त्री शिक्षणाविषयी केलेले प्रयत्न व त्यांना आलेल्या सामाजिक अडचणी याचाही मी पुर्णपणे अभ्यास केला. आपणही अशी धडपड का करु नये? असे विचार मनात आल्यामुळे मी हा वसा आपणही चालवावा म्हणून सतत प्रयत्न करत असते. यासाठी मला खऱ्या अर्थाने प्रेरणा मिळाली असेल तर ती माझ्या आजीसासू लोकमाता स्व. सावित्रीताई व्यंकटरावजी रंधे यांच्या कृतिशील कार्यातुन! त्यांनी शाळांसाठी वेळोवेळी आर्थिक मदतही केली. मुलींसाठी विशेषत: आदिवासी मुलींसाठी शैक्षणिक साहित्य पुरविणे, त्यांच्या गणवेशासाठी आर्थिक मदत करणे, प्रसंगी त्यांना वसतीगृहात प्रवेश मिळवून देणे हा त्यांचा आदर्श माझ्या डोळ्यासमोर आहे. बोराडीच्या सामाजिक व राजकीय जीवनात सन १९७५ मध्ये गावातील सर्व महिलांना सामाजिक जाणीवेतून एकत्र करुन आपणही राजकीय क्षेत्रात सर्व महिलांनी एकत्र सहभागी व्हावे म्हणून बोराडी ग्रामपंचायतीत सर्व महिला सदस्य बिनविरोध निवडून आणल्यात व सरपंच पदाची धुराही सांभाळली. त्या काळात शासनाचे कोणतेही महिला आरक्षण धोरण नव्हते. सार्वजनिक स्वच्छता व आरोग्य याकडेही तेवढेच लक्ष त्याकाळात त्यांनी दिले ही कामे करतांना कौटुंबिक जबाबदारीकडे दुर्लक्ष होवू दिले नाही. कर्मवीर आण्णासाहेब व्यंकटरावजी रणधीर यांनाही सावलीप्रमाणे साथ दिली. म्हणून मला त्यांची घरातूनच मिळलेली कृतीशील प्रेरणा आहे.

या क्षेत्रात येणाऱ्या महिलांना आपण समाजासाठी आपल्या परीने शक्य तेवढे जास्तीत जास्त उपयोगी पडण्याचा प्रयत्न करावा यासाठी अडचणी आल्या तरी न डगमगता किंवा न घाबरता सतत कार्यमग्न राहणे व कृतीशील राहणे हेच मला आवडते.

आजच्या बदलत्या काळात महिलांची सुरक्षिततासुध्दा धोक्यात आली आहे, महिला या विज्ञान युगात व संगणक युगात अग्रसेर आहेत मग ते क्रिडाक्षेत्र असो किंवा राजकीय क्षेत्र असो की शैक्षणिक क्षेत्र असो पण महिला निर्भिड होणे ही सामाजिक जबाबदारी आहे. तिला समाजाकडून, कुटूंबाकडून, परिवाराकडून सुरक्षाही मिळाली पाहिजे व संधीही मिळाली पाहिजे. शेवटी मिळालेल्या संधीचे तिने सोनेही केले पाहिजे हीच अपेक्षा.

**पत्ता : मधुर व्हिला, प्लॉट नं.८,**
**रसिकलाल पटेल नगर, शिरपूर जि.धुळे.**

**आवाहन**

मासिक शिक्षण यात्री हे संपूर्ण महाराष्ट्रात वितरीत होणारे शैक्षणिक मासिक असून शिक्षक - पालकांच्या हक्काचे व्यासपीठ ठरले आहे. ग्रामिण भागातून केलेल्या या प्रयत्नास आर्थिक चणचण असणारचं ! म्हणून यथाशक्ती आर्थिक मदत देवून मासिकास सहकार्य करावे.

शाळा अनूदानातून नियतकालिके / मासिके यांसाठी खर्च करू शकतात. शाळासिध्दी मुल्यांकनात मासिकाचे वर्गणीदार असणे आवश्यक. आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी नियतकालीकातून लेख प्रसिध्द होणे गरजेचे.

टिप : शैक्षणिक लेख,विचार,अनूभव,तसेच स्वरचित कथा कविता पाठवावयाचे असल्यास
शिक्षणयात्री या मेलवर पाठवावा. सोबत स्वत:चे नांव,पत्ता,शाळा,पासपोर्ट साईज
फोटो पाठवावा. ३००/- वर्गणी चेक/डि.डी./मनीऑर्डर संपर्क पत्यावर पाठवावे.

**Email id-shikshanyatri11@gmail.com**

# सावित्रीच्या लेकी...



**मधुलिका सोनवणे**
जळगांव,
चलभाष ७२१८३३८०९२

**उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या सिनेट सदस्या पी.एच.डी.संशोधनाच्या मार्गदर्शक, व्यवस्थापनात हातखंडा असलेल्या मधुलिका सोनवणे यांनी सुरूवातीच्या काळात मार्केटींग अधिकारी म्हणून ग्रामीण भागात काम करून जिद्दीने शिक्षण पूर्ण करीत वाणिज्य क्षेत्रातील पदवीसह पीएचडी चा प्रवास साध्य केला आहे. प्रशिक्षणाच्या माध्यमातून महिला सक्षमीकरणावर भर देत आहेत. त्यांच्या क्षेत्रातील कार्याबद्दल विविध पुरस्कारांनी त्यांचा वाढलेली उंची महिला म्हणून नक्कीच अभिमानास्पद आहे.**

बालपण धुळ्यात गेले. इयत्ता चौथी पर्यंत कनोसा कॉन्व्हेंट या शाळेत शिक्षण घेतलं, सर्व कार्यक्रमांमध्ये सहभाग असायचा. चौथीत असतांना वडीलांचा ॲक्सीडेंट झाला व त्यानंतर अनेक ऑपरेशन्स या दरम्यान जळगांव येथे बदली झाल्याने इयत्ता पाचवी पासून आर.आर.च्या न्यू इंग्लिश स्कूल मध्ये ॲडमीशन घेतली. लहानपणा पासून खेळाची आवड असल्यामुळे अनेक बक्षीसे मिळवली. परंतु डॉ.बेंडाळे महिला महाविद्यालय जळगांव येथे अकरावी कॉमर्स ला ॲडमीशन घेतली. त्यावेळेस ह्या कॉलेजला कॉमर्स मराठीतून होते. व त्यावेळेस प्राचार्य डॉ.आर.डी.राणे सरांच्या प्रोत्साहाने आम्ही अठरा मूलींनी इंग्रजी माध्यमातून कॉमर्सला ॲडमीशन घेतली व कॉलेजमधून इंग्रजी माध्यमातून कॉमर्स सुरू झाले. कॉलेज मध्ये खेळ, रननीती तसेच सांस्कृतीक कार्यक्रम उपक्रमात अनेक बक्षीसे मिळवली. एनसीसी अंडर ऑफीसर म्हणून अनेक कॅम्प केले शुटींग चे गोल्ड मेडल्सही मिळवले. उत्कृष्ट विद्यार्थीनी व कॉम्प्युटर या विषयात पहिली आल्याने केशव महादू कोते पुरस्कार मिळाला. नंतर वडीलांच्या प्रोत्साहनाने एबील मार्केटींग केले. स्वत:ची कंपनी सुरू करावी म्हणून प्रयत्न केला पण अनुभव कमी असल्याने जमत नव्हते. कंपनीमध्ये नोकरी केली व त्याचवेळी विदर्भ व खान्देश क्षेत्रातील गांवमध्ये काम करण्याची संधी मिळाली. महीला मार्केटींग अधिकारी म्हणून प्रशंसा मिळाली व जेवढे टार्गेट इतर ऑफीसर पूर्ण करायचे त्यापेक्षा जास्त कार्यक्षमतेने काम केले. शिकवण्याची आवड असल्याने व्होकेशनल कोर्सेसला मधून मधून शिकवत होते व त्या माध्यमातूनच जळगांव जिल्हा मराठा विद्या प्रसारक संस्थेच्या नूतन व्यवस्थापन रीसर्च संस्थेत डायरेक्टर म्हणून रूजू झाले व पूर्ण वेळ प्राध्यापक म्हणून कार्य केले. या दरम्यानच विद्यापीठात रीडरच्या जागेवर सीलेक्शन झाले व व्यवस्थापनशास्त्र प्रशाळेत आज पर्यंत कार्यरत आहे. महिला म्हणून अनेक अडचणी आल्या परंतु अनेक संधी ही उपलब्ध झाल्या. त्यातीलच एक म्हणजे स्त्री अभ्यास केंद्रात प्रमुख म्हणून नियुक्ती आजही कार्यरत आहे तसे उमविच्या एकूण पाच गर्ल्स हॉस्टेल ची जबाबदारी चीफ रेक्टर म्हणून सांभाळले आहे. स्त्री म्हणून समाजात वावरतांना मान सन्मान तर मिळतोच. त्याबरोबर विद्यापीठातील प्राध्यापक म्हणून विदेश महत्त्वाचे स्थान मिळते. स्त्री सक्षमीकरणावर काम करत असतांना फक्त आर्थिक सामाजिक सक्षमीकरण नाही तर मनाने व विचारांनी स्वत: स्त्री म्हणून सक्षम असणे व हाती आलेले कार्य समर्थपणे पूर्ण करणे यावर अधिक भर असतो व ट्रेनर्स म्हणून तसे ट्रेनिंग देण्याचा प्रयत्न असतो.

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील व्यवस्थापन अभ्या प्रशाळेमध्ये सहयोगी प्राध्यापक या पदावर कार्यरत असून ऑगस्ट २०१७ पासून मुलींच्या वसतिगृहाच्या चीफ रेक्टर व स्त्री अभ्यास केंद्राच्या (नोव्हेंबर२०१७) पासुन विभागप्रमुख म्हणून कार्यभार सांभाळतेय. डॉ. पुणे विद्यापीठातून वाणिज्य शाखेची पदवी बरोबरच एम.बी.ए., एम.फील आणि पीच.डी. मनुष्यबळ विकास या विशेष विषयांमध्ये प्राविण्य मिळविले. तसेच उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या 'सिनेट' सदस्या असून



बी.ओ.एस. च्या सदस्या पण आहेत.

अध्यापनाचा एकूण १५ वर्षांचा कार्यकाळ पूर्ण झाला असून विविध संस्था व विद्यापीठांमध्ये सुविधा, प्रशिक्षण, शिक्षक प्रशिक्षक व उद्योग क्षेत्रामध्ये प्रशिक्षण शिबीरे राबविली आहे. अध्यापनासोबत विविध संशोधन संस्थांचा निधी प्राप्त करून तीन व दोन वर्षांसाठीचे प्रमुख संशोधन प्रकल्प व उद्यम प्रायोजित प्रकल्प पूर्ण केले आहे. माझ्या मार्गदर्शनात १० संशोधकांचे पीएच.डी.संशोधनाचे काम सुरू असून एका संशोधकाला पीच.डी. ची पदवी प्रदान करण्यात आली असून एक संशोधन प्रबंध विद्यापीठाकडे जमा करण्यात आलेला आहे.

आपल्या विषयाव्यतिरिक्त संगणक विज्ञान विभागासाठी 'मास एबल सॉफ्टवेअर' तयार करण्यास मदत केली आहे. तसेच आपल्या विषयांतर्गत विविध पुस्तकांतून अनेक विषयांवर त्यांचे १५ हून अधिक प्रकरणे प्रकाशित असून विविध संशोधन नियतकालिकांमधून ४० पेक्षा अधिक संशोधन लेख प्रकाशित झालेले आहे. ७० पेक्षा अधिक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील परिषदा व कार्यशाळांमध्ये आपली उपस्थिती नोंदवली आहे. तसेच २० पेक्षा अधिक परिषदा आणि कार्यशाळांमध्ये प्रमुख पाहुणे म्हणून निमंत्रित करण्यात आलेले आहे.

त्यांना त्यांच्या क्षेत्रातील कार्याबद्दल राष्ट्रीय स्तरावरील आदर्श शिक्षक २०१३, राष्ट्रीय गौरव पुरस्कार २०११, महात्मा ज्योतिबा फुले शिक्षक पुरस्कार २०१०, दायित्व पुरस्कार २०११, केशव महादु कोल्हे पुरस्कार इ.अनेक पुरस्कारांचा सन्मान प्राप्त झालेला आहे. सोबतच विद्यापीठाच्या विविध महत्त्वाच्या समित्यांची जबाबदारी त्यांनी पार पाडली असून संबंधित समितींवर आपल्या कार्याच्या माध्यमातून अमुल्य असे योगदान दिले आहे आणि भविष्यात देखील निरंतर देणार आहे.

सामाजिक बांधिलकी म्हणून विविध सामाजिक संघटनांशी जुळलेली असून त्यांच्या अंतर्गत होणाऱ्या वेगवेगळ्या कार्यक्रमांमध्ये मार्गदर्शक म्हणून आपला सक्रिय सहभाग नोंदवित असते.

समाज परिवर्तनाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी शिक्षण क्षेत्राची निवड केली असून त्यासाठी माझ्या, त्यांच्या कुटुंबाकडून मार्गदर्शन व प्रेरणा मिळाली आहे.

गेल्या कित्येक दशकांपासून महिलांवर अन्याय अत्याचार होत आहेत. त्यापासून स्वत:ची सुरक्षा करण्यासाठी शिक्षित होणे हा एकमेव मार्ग आहे. त्याकरिता प्रत्येक महिलेने स्वायत्त शिक्षण घेऊन स्वत:चा, कुटुंबाचा, समाजाचा आणि देशाचा विकास साध्य कारावा असा या क्षेत्रात येणाऱ्या महिलांना संदेश आहे.

**पत्ता: – व्यवस्थापन प्रशाला,**

**उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,**

**जळगांव.**

# सावित्रीच्या लेकी...



**दिपाली जोशी**
धुळे
चलभाष ९९२३३०२४१८

नोकरी सोडण्याचे धाडस, पतीच्या व्यवसायात हातभार लावण्याचा निर्धार, व्यवसायातील परिश्रम या तीनही बाबी जुळवणाऱ्या दिपाली जोशी 'शाईन क्लीनर्स'च्या यशस्वी उद्योजिका म्हणाव्या लागतील. महिला म्हणून उद्योग सांभाळतांना सुरूवातीला केलेल्या कष्टाची कामे पाहून सुरक्षीत नोकरी बरी होती या टिपन्नीकडे दुर्लक्ष करीत साफसफाई उत्पादकांना बाजारपेठ मिळवून देण्याच्या पतीच्या प्रयत्नांना जोड देत, 'बेस्ट कपल मेड फॉर बिझीनेस' नावाचा मिळालेला पुरस्काराने उमेद वाढली आहे.



जमिनी मधील बी अंकुरते, त्यातून एक छोटेसे रोपटे बाहेर येते. कधी मायेने केलेली जपणूक तर कधी परिस्थितीचे फटकारे सहन करून ते रोपटं स्वतःला वाढवत,उभं राहतं, टवटवून फुलत, फळा फुलांनी लगडत आणि हवेच्या मस्त लहरीवर मजेने डोलत. अगदी सहज , प्रेमाने आयुष्याच सार सांगत.

स्वातंत्र्योत्तर काळातील भारतीय महिलांची कथा अगदी या रोपट्या सारखीच आहे.भारतीय महिलांनी घेतलेली झेप थक्क करणारी आहे.शिक्षण, संधी, नियोजन, सहनशीलता , सहकार्य आणि अफाट परिश्रम यांच्या साथीनं भारतीय महिलांनी काळाच्या पडद्यावर स्वतःचा ठसा उमटवला आहे.

महिलांच्या कार्य कर्तृत्वाच्या या महासागरात एक थेंबरूपी माझेही अस्तित्व आहे याचा मला अभिमान वाटतो.

माझा जन्म पनवेलला कोकणात झाला परंतु त्यानंतरचे आजपर्यंतचे सगळे जीवन धुळ्यात गेले.

१० पर्यंतचे शालेय शिक्षण कमलाबाई शंकरलाल कन्या शाळेसारख्या चांगल्या मूल्यांची जपणूक करणाऱ्या आणि आपल्या विध्यर्थिनींच्या सर्वांगीण विकासात भर घालणाऱ्या शैक्षणिक संस्थेत झाले.

बालपणीचा काळ सुखाचा या ओळींची प्रचिती देणारे बालपण गेले.आमचे पंचकोनी कुटुंब!

आई,वडील,तीन वर्षांनी लहान एक भाऊ आणि माझी आजी जिला आम्ही माई आजी म्हणायचो असे आमचे पाच जणांचे कुटुंब होते. भरपूर मित्र मैत्रिणी , आते,मावस,चुलत

भावंड ह्यांचा बरोबर खेळत हुंदडत वय पुढे पुढे सरकत होत. वडील शासकीय दूध योजनेत अधिकारी पदावर नोकरीला होते.संस्कार,शिस्त,काटकसर आणि प्रेम या चार भिंतीच्या आधारावर आमचे कुटुंब सुखात होते.

माई आजी विषयी तर मी काय सांगु.. तिच्या मायेने डोक्यावरून फिरणाऱ्या हाताचा स्पर्श आजही तसाच कायम आहे.आज ती या जगात नसली तरी ती तो डोक्यावरील हात अजूनही तसाच आहे, म्हणूनच आज जगाच्या व्यापात कधीही एकट वाटत नाही.

दहावी नंतर अकरावी बारावी जो आर सिटी हायस्कुल तर त्यानंतर लील पर्यंतचे शिक्षण जयहिंद सिनिअर कॉलेजला झाले. MPM² हे पदवित्तर शिक्षणही जय हिंदच्याच व्यवस्थापकीय संस्थेत घेतले.

शिक्षणानंतर एक वर्ष मुंबईत तर ३ वर्ष धुळ्यात खाजगी संस्थामध्ये काम केले.

५ जुलै २००० ला धुळ्याचे श्री सचिन पद्माकर जोशी यांच्याशी विवाह झाला. त्यांचे हार्डवेरचे दुकान होते. २००१ साली माझ्या मुलाचा म्हणजे अमेयचा जन्म झाला आणि माझ्या संसार वेलीवर गोरे गोमटे गोंडस फुल उमलले!!

२००२ ते २००७ पर्यंत आकाशवाणीवर कंत्राटी निवेदिका या पदावर काम केले.

२००७ सालापर्यंतचा काळ सामान्यपणे पार पडला २००७ मध्ये मात्र जीवनाला वेगळी कलाटणी मिळाली. यजमानांना काही अपरिहार्य कारणामुळे त्यांचे हार्डवेअर चे दुकान बंद करावे लागले. मी धुळ्यातील एक खाजगी संस्थेत अर्थात कंपनीत नोकरी करु लागले. आता पुढे काय करावे हा त्यांच्या समोर मोठा यक्ष प्रश्न होता. त्यांनी फिनाईल चा कारखाना काढण्याचे ठरवले. या उत्पादन निर्मितीचे त्यांचे थोडे प्रशिक्षण झाले होते.त्याच्या विक्रीचा त्यांना थोडासा अनुभव होता. या व्यवसायला खूप मोठया जागेची अथवा भांडवलाची आवश्यकता नव्हती.

ते त्यांच्या व्यवसायात आणि मी माझ्या नोकरीत असे आमचे आयुष्य सुरू होते.ह्यांचे काम हळूहळू वाढत होते, ह्यांना माणसांची गरज होती पण हवी तशी माणस मिळत नव्हती.एक दिवस माझ्या मनात विचार आला आपणच ह्यांना मदत केली तर..बाहेर नोकरी करण्यापेक्षा घरच्याच व्यवसायाला हातभार लावला तर...विचार उत्तम असला तरी निर्णय घेणे तितके सोपे नव्हते. माझ्या नोकरीत मला धुळ्याच्या मानाने चांगला पगार आणि अधिकाराचे पद होते.बढतीच्या संधी नजरेच्या टप्प्यात होत्या, हे सगळं सोडून पुन्हा नव्याने श्रीगणेशा करण काहीस धाडसच होत. माझा निर्णय यशस्वी ठरला तर आनंद आहे पण नाही ठरला तर....जरा प्रश्नचिन्ह होते. परंतु अनेक दिवस विचार करून शेवटी नोकरीला राम राम ठोकला .

१६ एप्रिल २०१० रोजी शाईन क्लीनर्स मध्ये रुजू झाले. मी आल्यामुळे सहाजिकच ह्यांचा उत्साह द्विगुणित झाला. आम्ही पुढील वाटचालीचे नियोजन केले.व्यवसाय म्हणजे रोज नव्या अडचणीला सामोरे जाणे. व्यवसायात रोजचा दिवस नवीन असतो , कालच्या सारखे काहीच नसते. कच्चा माल आणून त्यावर प्रक्रिया करून नवीन माल तयार करणे आणि तो हव्या त्या पॅकिंग मध्ये विकणे असे उत्पादनाचे स्वरूप असते. त्यात इतर अनेक छोट्या छोट्या गोष्टी अंतर्भूत असतात.

आमच्या कंपनीचे वैशिष्ट्य म्हणजे आम्ही आमची सर्व उत्पादने घरपोच नेऊन देतो.आजच्या काळात अनेक मोठया कंपन्या होम डिलिव्हरी अर्थात घरपोच सेवा देतात. आम्ही २००७ सालापासून आजही हे सेवा देत आहोत.

अगदी सुरवातीला मी माल बनवायचा आणि ह्यांनी तो विकायचा अस छोटस स्वरूप होतं, मग हळूहळू माल बनवायला कामगार ठेवले. या कार्यासाठी लागणारे अर्थ सहाय्य बँकेकडून घेतले.

हळूहळू आमचा चांगला जम बसू लागला होता तेवढ्यात एक मोठी अडचण उभी राहिली. आमच्या व्यवसायाची जागा भाडेतत्त्वावर होती, ती आम्हाला सोडावी लागली. निवासी कॉलनीत व्यवसायासाठी नवीन जागा आम्हाला मिळेना आणि धुळे शहरापासून लांब अंतरावर असलेल्या एळवल मध्ये लगेच स्थलांतरित होणं आम्हाला शक्य नव्हते. काय करावे हा यक्ष प्रश्न समोर होता शेवटी घराच्या गच्चीत पत्र्याची शेड टाकून

काम सुरू ठेवले. उघडया गच्चीवर काम करतांना उन्हाचे चटके लागत होते परंतु आपला व्यवसाय थांबला नाही तो सुरू आहे ही भावना मनाला उभारी देत होती.

कालांतराने आम्ही शाईन क्लिनर्स साठी नवी जागा विकत घेतली आणि तिथे स्वतःचे मॅन्युफॅक्चरींग युनिट अर्थात उत्पादन केंद्र उभे केले. आज होलसेल आणि रिटेल या दोन्ही क्षेत्रात शाईन क्लिनर्स ची घोडदौड सुरू आहे.सुरवातीला आम्ही फक्त फिनाईल हे एकच उत्पादन करीत होतो आता त्यात १० नव्या उत्पादनाची भर पडली आहे. आम्हाला लागणाऱ्या कच्च्या मालातील एक घटकही आम्हीच उत्पादित करतो. धुळ्यात आणि धुळयाबाहेर शाईन क्लिनर्सच्या उत्पादनांना चांगली मागणी आहे .

गुणवत्तेचा आग्रह आणि त्यात टिकवलेले सातत्य हाच आमच्या कार्याचा आधारस्तंभ आहे. २०१६ ला एका संस्थेद्वारे आम्हा दोघांना बेस्ट कपल मेड फॉर बिझनेस या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्यावेळी आम्हा दोघांना अतिशय आनंद झाला. आपण पुरस्कारासाठी काम करत असतो अशातला भाग नाही पण पुरस्काररूपी कौतुकाची थाप माणसाला नवी उमेद देत असते.व्यवसाय हे माणसाच्या उपजीविकेचे चांगले भर भक्कम साधन होऊ शकते . सकारात्मक विचार आणि प्रत्येक गोष्टीचा बारकाईने अभ्यास केल्यास आपण आपली स्वप्ने प्रत्येक्षात उतरवू शकतो.

आम्ही साफसफाईची उत्पादने बनवतो शिवाय ती घरपोच नेऊन देतो, हे पाहून सुरवातीला अनेक लोकांनी आमची हेटाळणी केली. हे कशाला करत बसलाय,ह्यातून असे कितीसे पैस मिळणार आहेत अशा शंका उपस्थित केल्या. मी युनिट वर अर्थात उत्पादन केंद्रात फरशी पुसण्यापासून, माल बनवणे, आर्थिक निर्णय घेणे इत्यादी सर्व कामे हाताळत होते. तेव्हा माझ्या जवळचे लोक माझ्या कडे बघून ,चांगली होती ती नोकरी सोडून हिला ही अवदसा आठवली आहे असे बोलत होते.

आपल्याकडे नोकरी करणे प्रतिष्ठेचे मानले जाते आणि स्वतःच्या व्यवसायासाठी थोडे अधिक शाररिक श्रम करणे कमीपणाचे मानले जाते. परंतू मला स्वतःला सर्व कामे करीत असताना आनंदच झाला. नोकरी सोडण्याचा कधीही पश्चाताप झाला नाही. ज्याप्रमाणे आईला आपल्या मुलाच्या संगोपानाचे कष्ट होत नाही त्या प्रमाणे मला माझ्या व्यवसायातील कोणत्याही कामाचे कष्ट जाणवले नाहीत.

आता मात्र माझी परिस्थिती बदलली आहे. उत्पादन केंद्रातच काय पण घरीही सर्व कामांना माणसे आहेत.

या सर्व प्रवासात मला माझ्या माहेरच्या व सासरच्या सर्व माणसांचे सहकार्य आणि प्रोत्साहन लाभले आहे. या व्यतिरिक्त मला सगळ्यात मोठा आधार वाटला तो पुस्तकांचा!

वाचनाचा छंद असल्याने मला विविध विषयांवरील पुस्तक वाचायला आवडतात. उद्योगावरील , मॅनेजमेंट वरील, मोठ्या लोकांची विशेषतः उद्योजकांची आत्मचरित्र वाचायला मला खूप आवडते. पुस्तकांनी मला प्रेरणा दिली. कठीण प्रसंगातून मार्ग काढायला शिकवले. पुस्तकातील शब्दांचीच कधी मायेने जवळ घेतलं तर कधी कठोरपणे स्वतःचे आत्मपरीक्षण करायला लावले.

स्वतःचा व्यवसाय करीत असताना एका समाजसेवी संस्थेशी संलग्न होउन अल्प का होईना समाजकार्य करण्याचा प्रयत्न चालू आहे.यापुढे अजून खूप मोठी स्वप्न आहेत,खूप पुढे जायचे आहे. आपण स्त्रिया मोठ्या भाग्यवान आहोत. सृजनता,सहनशीलता आणि नियोजन हे गुण आपण निसर्गाकडून घेऊन आलो आहोत, त्याला अभ्यास आणि व्यवहाराची जोड दिली तर आपण हवे ते करू शकतो. आपण सारे काही करत असताना कुटुंबाकडे दुर्लक्ष होता कामा नये. शेवटी इतकंच सांगेन,

कधी ऊन बोचरे अन कधी तृप्त चांदण्यात..
जपला साऱ्या ऋतूत मनातला वसंत....!!!
धन्यवाद!!

**पत्ता : प्लॉट नं.६३ निवांत, महावीर कॉलनी, मलेरिया कार्यालयामागे, व्हीडब्लूएस कॉलेजमागे साक्रीरोड, धुळे**

# सावित्रीच्या लेकी...



**मंजुषा हेमंत भिडे**
जळगांव,
चलभाष ९४२०५५९२६०

**आजोबांकडून झालेला नाटकांचा संस्कार, पुढे कायम राहिला. नाटकातील अभिनयाने समृद्ध होऊन विविध नाटकांचे यशस्वी प्रयोग केले. बालपणापासून हॉलीबॉल खेळाची आवड, राष्ट्रीय स्तरावर पंधरा वेळा सहभाग, सध्या हॉलीबॉल खेळाची नॅशनल रेफरी म्हणून काम करणाऱ्या मंजूषा भिडे यांचे खेळ, नाट्य, शिक्षण या तिनही क्षेत्रात कार्य आहे. नाटक चळवळीतील 'परिवर्तन' या संस्थेच्या माध्यमातून महिला सक्षमीकरणाचा मुद्दाही पुढे आणत असतात. समृद्ध अभिनयाच्या जोरावर मानसन्मान मिळवत विविध पुरस्कारांचेही धनी मंजुषा भिडे ठरल्या आहेत.**

माझा जन्म विदर्भातील अकोला येथे १९७० साली १२ एप्रिलचा. पूर्वाश्रमीची मी मंजुषा रामचंद्र शिदोरे. माझे शालेय आणि महाविद्यालयीन शिक्षणही अकोला इथेच झाले. लहानपणापासूनच अभ्यासापेक्षा माझा कल खेळ, नाटक, नृत्य ह्यामध्येच जास्त.थोडी टॉम बॉय प्रवृत्ती. माझे वडील उत्कृष्ट व्हॉली बॉलपटू त्यांच्यामुळेच मी या खेळाकडे आकृष्ट झाले आणि त्यात प्राविण्य मिळवले. सुरूवातीला माझा कल खेळाकडे. ह्यामध्ये राष्ट्रीय स्तरावर १५ वेळा सहभाग तसेच व्हॉलीबॉल ची नॅशनल रेफरी म्हणून सध्या कार्यरत. आमच्या घरी आजोबा आई-वडील एक बहीण-एक भाऊ असं संयुक्त कुटूंब घरात पूर्वीपासूनच कलात्मक व पुरोगामी वातावरण आजोबा उत्तम चित्रकार तसेच उत्तम गायक व नाटकात उत्तम अभिनय करणारे होते. अगदी पं.भीमसेन जोशींपासून मोठमोठ्या मंडळींच्या बैठकी व्हायच्या. कदाचित नाटकाचं आणि गाण्याचं बाळकडू मला आजोबांकडून मिळालं. एकदा शाळेतील एका नाटकातील भुमिका अपघातानेच मला करावी लागली. आणि तेव्हा माझ्या शाळेतील श्री.प्रकाश जोशी सरांनी माझ्यातील अभिनेत्रीला हेरलं आणि इ. ९ वी पासूनच मी त्यांच्या 'रूपयातन' ह्या संस्थेमार्फत नाटकांमधून भूमिका करायला सुरूवात केली. सुरूवातीला छोट्या भूमिकांपासून सुरू झालेला हा प्रवास मग 'मुंबईची माणसं' मला काही सांगायचंय' 'डार्लींग डार्लींग',वगैरे सारख्या नाटकांतील प्रमुख भुमिका करण्यापर्यंत पोहोचला. मात्र कालांतराने क्रीडा क्षेत्रातील आगेकूच व पुढे लग्न ह्यामुळे थोडा खंड पडला. लग्नानंतर (१९९३) मी मंजुषा हेमंत भिडे होऊन जळगांवला आले. इथे आल्यानंतरही जवळपास ७ ते ८ वर्ष नाट्यक्षेत्राशी संपर्क आला नाही. कारण तोपर्यंत या क्षेत्रील कुणाशी फारसा परिचय नव्हता. मात्र एक दिवस राज्यस्पर्धेला केवळ ८ दिवस उरले असतांना स्व. श्री. देविदास परदेशी सरांच्या नाट्यसंस्थेतील सुनील भटकर ह्यांनी अचानक नाटकातील प्रमुख भूमिकेविषयी विचारणा केली ते नाटक होतं 'नियोगगाथा'. मी पण भरपूर लांबीचा आणि पल्लेदार संवाद असलेला हा रोल चॅलेंज म्हणून स्वीकारला आणि ८ दिवस १२-१२ तास प्रॅक्टीस करून जो रोल चांगल्यापद्धतीने सादर केला. त्याचवर्षी कामगार कल्याणच्या राज्यनाट्य स्पर्धेत प्राथमिक फेरीत अभिनयासाठी पारितोषिकही मिळालं. आणि मग पुढे ह्याच संस्थेमार्फत 'नरक्लिंब', 'ती वेटींग रूम', 'त्याची गोष्ट' इ. नाटकांसाठी अभिनयाची पारितोषिके मिळाली आणि नंतर 'अरे सहकार सहकार' ह्या नाटकातील भूमिकेसाठी अभिनयाचं रौप्यपदक प्राप्त झालं. ह्या सगळ्या प्रवासात एक महिला म्हणून माझ्या सुदैवाने मला चांगली माणसं भेटत गेली त्यामुळे माझ्या गाठीशी चांगलेच अनुभव आलेत. प्रत्येक वेळी एक महिला म्हणून आदर मिळत गेला. मात्र मी माझ्या महिला असण्याचा कधी बाऊ केला नाही. रात्री एक-एक वाजला तरी घरी एकटीने येणं, घरच्या सगळ्या जबाबदाऱ्या पूर्ण करून नाटकासाठीही आवश्यक तेवढा वेळ देणं, परत नोकरी अशा तिन्ही आघाड्या व्यवस्थित सांभाळू शकले. कारण लग्नाआधीही आणि लग्नानंतरही मला घरच्यांचा

पूर्णपणे पाठींबा मिळाला. प्रत्येक नाटकाच्या सरावानंतर आणि प्रयोगानंतर मी अधिकाधिक समृद्ध होत गेले. भूमिकेचा खोलवर विचार, पात्राची मनोभूमिका ह्या सगळ्या गोष्टी शिकत गेले. ह्या टप्प्यावर असतांना एकदा अंतीम फेरीत नाटक सादर करण्याकरीता मुंबईला जायचे होते. सराव सुरू होता. मात्र दरम्यान माझा अपघात झाला. माझा उजवा पाय पूर्ण सुजला. सूज उतरत नव्हती. तशाच स्थितीत मी मुंबईला गेले आणि पूर्ण पाय सूजलेला असतांनाही संपूर्ण नाटक व्यवस्थीत पार पाडले. नटराजाच्या कृपेने नाटक सुरू असतांना मला कोणत्याही वेदना झाल्या नाहीत पण नाटक संपल्यानंतर मात्र पुन्हा पाय सुजला पण बाकी तशा फारशा अडचणी आल्या नाहीत. पुढे मग 'परिवर्तन' जळगांव ह्या संस्थेत प्रवेश केला. आणि तिथे नाटक करणं काय असतं नाटकाची स्क्रिप्ट कशी अभ्यासावी, आपल्या पात्राबरोबरच इतरही पात्रांची मनोभूमिका समजून घेणं, एकमेकांशी प्रत्येकाच्या कुटुंबासहीत बाईंडींग असण अशा अनेक गोष्टी श्री.शंभु पाटील सरांमुळे शिकायला मिळाल्या आणि नाटकाचे अनेक आयाम उलगडले. ह्यात मोहन राकेश ह्यांच्या 'आधे अधुरे' ह्या नाटकाचं श्री. शंभु पाटील सरांनी 'अपूर्णांक' नावाने रूपांतर केलं आणि संपूर्ण महाराष्ट्रभर ह्या नाटकाचे आम्ही ३५ प्रयोग आजपर्यंत सादर केलेत. ह्यातील भूमिकेसाठीही मला प्राथमिक फेरीत रौप्यपदक तर अंतीममध्ये गुणवत्ता प्रमाणपत्र मिळाले. अनेक दिग्गज कलाकारांनी मान्यवरांनी आमचं कौतुकही केलं. अभिनेता संदीप मेहता, नंदु जाधव, वीणा जामकर, अतुल पेठे ह्यांनी खूप प्रोत्साहन दिले. सगळीकडे नाटक संपल्यानंतर आम्ही नाटकांवर चर्चा ठेवत असू आणि उल्लेखनीय बाब म्हणजे सर्वात जास्त सहभाग चर्चेत महिलांचा असायचा. विशेष आठवणीत राहणारा प्रयोग म्हणजे आमचा 'हेमलकसा' येथे झालेला नाट्यप्रयोग. ह्या प्रयोगाला अनेक मान्यवर तरच होतेच परंतु डॉ.प्रकाश आमटे व मंदाताई आमटे यांनीही आमचा प्रयोग बघीतला आणि त्यानंतरच्या चर्चेतही सहभाग घेतला. दोघांनीही खूप कौतुक केलं. तसंच जळगांवला २५ व्या प्रयोगाला बालगंधर्व खुले नाट्यगृहात जवळपास २००० लोक नाटक बघायला आले होते आणि त्यांना ह्या नाटकाने शेवटपर्यंत खिळवून ठेवलं हाही प्रसंग विशेष लक्षात राहण्यासारखा. पुण्यासारख्या ठिकाणी एकाच दिवशी २ वेळा आम्ही ह्या नाटकाचा तिकीट शो केला.

माहेरच्यांच्या व आजोबांच्या प्रेरणेने व मी हे क्षेत्र निवडलं. आणि माझ्या सुदैवाने मला स्वत:ला सिद्ध करण्यासाठीच्या भूमिकाही मिळत गेल्या. माहेरी आजोबा आणि आई वडिलांच्या प्रेरणेने आणि सासरी सासु सासरे आणि नवऱ्याच्या पाठिंब्याने मी आजही या क्षेत्रात कार्यरत आहेत. नाटकाबरोबरच गेल्या ३ वर्षांपासून अभिवाचन क्षेत्रातही उल्लेखनीय काम केले आहे. अनेक नवीन महिलांकडून अभिवाचन करवून घेणं, त्यांना दिग्दर्शन करणं, त्यांना व्यासपीठ मिळवून देणं, त्यांचा आत्मविश्वास वाढवणं इ. तसेच शाळेतील मुलांच्या बालनाट्याचं दिग्दर्शन करून त्याच्यातही कौशल्य प्राप्त केलं आहे. ह्यासोबतच नृत्य स्पर्धांमध्ये दरवर्षी सहभाग असतो.

नोकरी, घरदार, नाटक ह्या सोबतच इ.९, १० वी च्या विद्यार्थ्यांना मी आणि माझे पती अभ्यासाचे नियोजन कसे करावे ह्याबाबत मार्गदर्शन करीत असतो. आतापर्यंत जवळपास ५०० विद्यार्थ्यांना आम्ही मार्गदर्शन विनामूल्य केले आहे. जळगांवातील सांस्कृतिक क्षेत्रात काम करणाऱ्या विविध संस्थांमध्ये सक्रीय सहभाग.

नाटक सिनेमा टि.व्ही. हे कोणालाही आकर्षित करून घेणारे माध्यम आहे. त्यामुळे ह्या माध्यमामधील चमकदारपणामुळे इथे प्रचंड स्पर्धा आहे. या प्रचंड स्पर्धेचा तणाव सहन करत या स्पर्धेत टिकून राहणं सोपं नाही. मग कास्टींग काऊच सारखी प्रकरणं आपण ऐकतोच आहोत. चांगली, वाईट माणसं प्रत्येक क्षेत्रात आहे. तशी ती या पण क्षेत्रात आहेत. आपल्याला आपली वाट निवडायची असते. माझा टि.व्ही.किंवा चित्रपटाशी फारसा संबंध नाही. नाटक हे माझं माध्यम आहे. परिवर्तन जळगांव हा आमचा ग्रृप एखाद्या कुटूंबासारखा आहे.विविध माध्यम आहे. विविध माध्यमामधून सतत काहीतरी परिवर्तनशील उपक्रम सुरू असणारी आमची ही संस्था या क्षेत्रामध्ये एक आदर्श उदाहरण आहे. परिवर्तन एक

प्रयोगशील संस्था म्हणून आता सर्व महाराष्ट्राला सुपरिचित आहे. अशा संस्थामध्ये आपण असलो की बाकी सर्व प्रश्न सोपे होतात. या क्षेत्रात येणाऱ्या नव्या मुलींना रंगमंचाच्या माध्यमाचा अनुभव म्हणून फार चांगला उपयोग होऊ शकतो पण या क्षेत्रात करिअर करायचं असेल तर मग सिनेमा माध्यम किंवा टिव्ही हे माध्यम. टिव्ही या माध्यमाला खूप मर्यादा आहेत. फक्त त्यामुळे तुम्ही लोकांपर्यंत झटपट पोहोचता पण पटकन विसरल्यापण जातात. पण या दोन्ही माध्यमात आपण जे तथाकथित सौंदर्याचे खोटे मापदंड निर्माण केले आहेत. त्याशिवाय प्रवेश पण नाही. ह्या खोट्या सौंदर्याच्या मापदंडामुळेच अनेक प्रश्न आहेत. म्हणून या सर्व गोष्टींचा विचार करूनच महिला, मुलींनी निर्णय घेतला पाहिजे.

कला ही माणसाला माणूस म्हणून समृद्ध करते. जाणीवेच्या कक्षा रूंदावतात. जगण्याला अनेक आयाम आहेत याची जाणीव होऊन जगणं समृद्ध होत हा कलेचा सगळ्यात मोठा फायदा आहे. कला म्हणून आपण कलेकडे न बघता यशस्वी होण्याचं माध्यम कलेला बनवल तर मग गोंधळ होऊ शकतो. याचा अर्थ यश मिळवू नये किंवा कलेला व्यावसायिक रूप देऊ नये असं नाही. ते झालं तर उत्तमच पण सर्वप्रथम आपण आपल्या कलेचा अभ्यास व साधना करत आत्मानंदाचा अनुभव घेतला पाहिजे.

आपल्या सामाजिक परिस्थितीत स्त्रीला कायमच दुय्यम स्थान आहे. अशा स्थितीला आपल्या रूढीग्रस्त परंपरा, धार्मिक समजुती व पुरूषी व्यवसथेचा मोठा पगडा कारणीभूत आहे. त्यामुळे स्त्री ही कायम नाकारली गेली. सावित्रीबाई फुले, महात्मा फुले, कर्वे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या अथक परिश्रमामधून हे चित्र बदलायला सुरूवात झाली. स्त्रियांच शैक्षणिक, सामाजिक राजकीय, व्यावसायिक क्षेत्रामधील भरारी ही उत्तुंग आहे. पण सगळच सुरळीत आहे असं नाही. चित्र अजुनही भयावहच आहे. घरगुती हिंसाचार, कामाच्या ठिकाणी होणारे शोषण, अत्याचार, स्त्री भ्रूण हत्या, राजकीय दुय्यम स्थान अशा एकना अनेक गोष्टी आहेत. ज्यामुळे स्त्री अजुनही पुर्णत: मुक्त नाही. पण येणारी पिढी हे चित्र बदलून टाकेल हे नक्की, हा आशावाद कायम आहे.

आम्ही आमच्या परिवर्तनाच्या माध्यमातून हे प्रश्न मांडण्याचा सातत्याने प्रयत्न करतो आहोत. या माध्यमाचा यापेक्षा आणखी चांगला उपयोग काय?

माइया नाट्यकलेमधून मी माझ्यामधील अस्वस्थतेला अभिव्यक्त करू शकले. माझ्या मधील बाईमाणूस अधिक समृद्ध होऊन जगण्याचा आनंद घेऊ शकले.

**पत्ता :- १७५, बळीराम पेठ, जळगांव**




**द्या शिक्षणाला गती, व्हा फुले सावित्री!**

**नारी शक्ती**
**महान शक्ती**





**सौ.वैशाली वासुदेव देवरे** नगरसेविका,

**सौ.चंद्रकला संतोष माळी** नगरसेविका,

शिरपूर वरवाडे नगरपरिषद,शिरपूर

# सावित्रीच्या लेकी...



**स्वाती प्रशांत पाटील**
आगार व्यवस्थापक शिरपूर ,
चलभाष ९५६१७७८४९१

**स्पर्धा परिक्षेच्या माध्यमातून प्रशासकीय अधिकारी होण्याचे भाग्य असतांनाही एस.टी. महामंडळाच्या आगार व्यवस्थापनासारखे पद स्वत:हून पदरी घेणाऱ्या, यंत्र अभियंता म्हणून शिक्षण घेऊन अनुभवाचा पूरेपूर वापर करून महामंडळाच्या शिरपूर आगाराचे यशस्वी व्यवस्थापन करणाऱ्या स्वाती पाटील यांनी 'जेथे कमी तेथे आम्ही' या सुत्रानुसार काम करीत चालक-वाहक यांचेसह साऱ्या कर्मचाऱ्यात आपलेपणाची भावना व स्वत:ची ओळख निर्माण केली आहे.**



माझं बालपण धुळ्यातच गेलं. वडील पाटबंधारे खात्यात कामाला. आई गावावर असलेल्या ग्रंथालयाची ग्रंथपाल. छोटा भाऊ व बहिण सर्व स्वत:च्याच दोघही माझ्या पावलावर पाऊल ठेवत इंजिनिअर आहेत. लहान भाऊ पियुष पाटबंधारे खात्यात ज्यु.इंजिनिअर व बहिण लेक्चरर आहे. थोडक्यात सांगायचे तर सर्वसामान्य कुटूंब व सर्वसामान्य स्थितीत आयुष्याला वळण देत वाट दाखवत माझ्या आई-वडीलांनी वेगवेगळ्या क्षेत्रात असलेले तीन अभियंते आमच्या घरात निर्माण केले. वर्तमानपत्रात येणाऱ्या कर्तृत्ववान अधिकाऱ्यांच्या संबंधित काही लेख किवा बातमी वाचली की, अशाच कर्तृत्वान अधिकाऱ्यांमध्ये कधीतरी माझ्याही लेकीचा समावेश व्हावा ही त्यामागची तीव्र इच्छा त्यांची असायची. त्यामुळे अगदी लहानपणापासूनच स्पर्धा परीक्षांची बीजे आम्हा बहीण-भावंडाच्या मनात कायमची रुजली होती.

म्हणतात ना, परिश्रम आणि संधी यांचा सुंदर संगम म्हणजे नशीब. २०१६ साली मिळालेल्या प्रत्येक संधीच सोनं झालं. २५ जून ते ३० जून दरम्यान एमपीएसीच्या तीन स्पर्धा परीक्षा व महामंडळाची एक अशी चारही परिक्षेत घवघवीत यश मिळाले होते. M.P.S.C.च्या निकालाची वाट पाहत Private S.S.V.P.S. Engg. College मध्ये प्राध्यापकाची नोकरी चालू ठेवायची की महामंडळाची नोकरी आधी स्विकारायची अशी बुचकळ्यात पडल्याची स्थिति होती. वडीलांनी केलेल्या मार्गदर्शनातून महामंडळात मी रुजू झाले. यंत्र अभियंता झाल्यानंतर अधिव्याख्याता म्हणून केलेलं माझ काम उल्लेखनीय होते. अचानकच महामंडळाचे वातावरण, प्रशासकीय जबाबदारी, व्यवस्थापन माझ्यासाठी अगदी नवीनच होते. मृदू आवाज व मवाळ स्वभाव असतांना महामंडळाचे वातावरण माझ्यासाठी आव्हात्मक होते. मला मिळालेले पद प्रशासकीय



अधिकारांचे असले तरी मला संघटना, कर्मचाऱ्यांचे नियोजन त्यांच्या सुट्टीपासून तर पगारापर्यंतचे नियोजन, प्रवासी, पत्रकार, राजकारण आगारातील सहाशे लोकांचे संघटन, Traffic व Mechanical यातील अडचणी पहाता आगार व्यवस्थापक हे पद खूपच जड झाल्यासारखे वाटले होते. भिती मनात निर्माण झाली होती. तरी ती माझ्या कामात मी दिसू न देता मोठ्या धाडसाने सुरुवात करायचे ठरविले. 'सर्वप्रथम कागद न चालवता गोड बोलूनही काम करुन घेता येतात' या तत्वावर मी लोकांची ओळख करायला सुरुवात केली. आपल्या आगारात असलेला प्रत्येक कर्मचारी आधी मी आपलासा करुन घेतला व त्यांच्या कौटुंबिक जीवनाशी मी जोडले गेले. महामंडळात रोजच निरनिराळे या अनुभवातून रोजच नवीन शिकवण मिळायची. व्यक्ती परत्वे स्वभाव बदलतो. अशा निरनिराळ्या स्वभावांच्या माणसांशीच परिचय वाढला. तसा माझ्या स्वभावात देखील बदल होऊ लागला.

महिला असल्याने व्यवस्थापनात सुरळीतपणा बाबत बहुतांश साशंक होते. मात्र मी शिस्तबध्द वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न केला. आगारातील कर्मचाऱ्यांनीही साथ दिली.

सीमेवरील सैनिक सीमेचे रक्षण करुन देशवासियांना सांभाळतो तर महामंडळाच्या एस.टी. चालक-वाहकांवर विश्वास दाखवत आपले आई, वडील, बायको, लहान मुले सुखकर प्रवास करु शकतात. म्हणूनच या चालक वाहकांचा अभिमान बाळगत सामाजिक जाणीव निर्माण करण्याचा प्रयत्न नेहमीच करत राहिले.

समाजाचे देणे लागतो या भावनेने रक्तदान शिबीराचा कार्यक्रम करुन वाढदिवस साजरा करणे, सेवानिवृत्ती दिन पार पाडणे, स्वच्छता मोहिमेला नियमीत अग्रक्रम देणे अशा सामाजिक कामांना सुरुवात केली. माझ्या सहकाऱ्यांनीही मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवल्याने माझाही आत्मविश्वास दुणावला. माझ्या शांत स्वभावाचेही रुपांतर आता थोड्या कणखर व कठोर स्वभावात झाले होते. आलेल्या प्रत्येक प्रश्नाला फक्त फणसासारख बाहेरुन थोड काटेरी होऊन म्हणजेच कठोर होऊन सोडवण्याची नविन युक्ती मला सहज अवगत झाली.

शिरपूर आगारात आजपर्यंतच्या इतिहासातील मी पहिली महिला आगार व्यवस्थापक. पुरुष मंडळीची बोलण्याची पध्दत, राहण्याबाबतच्या काही सवयी, सभ्यपणे बोलणे. आगारात वावरतांना व बाहेर डयुटीवर असतांना प्रवाश्यांशी त्यांची वागणूक यात आमूलाग्र बदल झाला होता. आगारात शिस्तीचे वातावरण हळूहळू दिसायला लागले. १९७७ पासूनचे बांधकाम त्यातील बदल, स्वच्छतेबाबत काही नियम हे दोन बदल मात्र कर्मचाऱ्यांनाही सुखावणारे होते.

समाजाची सेवा करण्यासाठी आपणास ही नोकरी मिळाली आहे. याबाबत 'जेथे कमी तेथे आम्ही' असे मी नेहमी म्हणायचे. Mechanical ला जेव्हा मुली नगण्य होत्या. असे असून देखील मी Diploma ला जात ते Field निवडले. जिथे महिलांचे प्रदर्शन कमी आहे तेथे मी असे सुत्र कदाचित लहानपणापासूनचं होते. प्रशासकीय क्षेत्रात काम करायची आवड असल्याने हे आगळवेगळे क्षेत्राची निवड केली.

हे यश व प्रेरणा कुणाची तर आईवडीलांच्या आशिर्वादाची, बहिण भावडांच्या प्रेमाची, सासरच्या आई नानांच्या पाठिंब्याची तसेच विभाग नियंत्रक देवरे सरांच्या मार्गदर्शनाची. ज्याच्याशिवाय सगळच अशक्य होते असे माझे पती निलेश

पाटील यांच्या सहकार्याची व विश्वासाची.

या क्षेत्रात येणाऱ्या महिलांकडून फक्त इमानदारची अपेक्षा आहे. मी स्त्री आहे म्हणून मी हे काम ह्या वेळी करु शकत नाही असे मनात ठेवून प्राविण्य मिळण्यासाठीची दिशात हरवून जाईल 'सर्वांना खूश ठेवेल असा मनुष्य अद्याप जन्मास यावयाचा आहे.' हे सतत लक्षात ठेवा, काहीही करा पण गुणवत्तापूर्ण, दर्जेदार काम करा. ज्या क्षेत्रात तुम्ही जाल त्यात जीव ओता, त्यात सर्वोच्च स्थळी पोहोचाल.

स्त्री जात पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून काम करत आहे. अगदी सगळ्याचा क्षेत्रात स्त्रीचा समावेश आता उल्लेखनीय आहे. तरी देखील एका बाजूला गौरवीकरण व दुसऱ्या बाजूला समाजात टोकाचे दुय्यमस्थान, शोषण, स्त्री वर्चस्व न सहन होणे, कौटुंबिक हिंसा, बलात्कार अशा अनेक सामाजिक समस्या स्त्रीयांसमोर आजही आहेत. परंतु अशा परिस्थितीवर कौशल्याने मात करण्यासाठीचे कसब फक्त स्त्रीकडेच आहे. स्त्री शक्तीकडे असलेले धाडसी निर्णय घेण्याची क्षमता, आत्मविश्वास, संयम, दबावाला भीक न घालण्याची वृत्ती यांना स्वत:मध्ये रुजवून बुध्दिंगत केले की जमीनही आपली आणि आकाशही आपले!

आगार प्रमुख हे पद मिळाल्यानंतर काम करत असतांना महिला/पुरुष असे मनात कधी आले नाही. जेवढे चांगले काम होईल तितके करायचे असे ठरविले होते. परंतु ही मुलगी काय आगार चालवणार? इथे चांगले पुरुष टिकले नाहीत असे उदगार करणाऱ्यासोबतच! बाकी आजही आगारात कमी वयात मोठी जबाबदारी यशस्वीरित्या सांभाळल्याचा अभिमान व्यक्त करुन मानात ठेवणारी पुरुष मंडळी ही शिरपूर आगारात आहे. म्हणूनच मी जिंकली आहे, त्यांना जिंकले आहे असे मला वाटते.

प्रसंग तसे अनेक, जे आठवणीत राहिले! त्यात चांगलेही व वाईटही, आगारातील तरुण मंडळीचे अपघातात झालेले निधन व तश्याच स्थितीत त्यांना द्यावयाची आर्थिक मदत, कौटुंबिक वातावरण पाहून केलेले सहकार्य आगारातील अनेक चुकीच्या सवयी बदलणे, प्रसंगावधान दाखवून अपघातक्षणी घेतलेले निर्णय, नियमात बसेल असे कोणाच्याही दबावाखाली न येता केलेली कामे अशा असंख्य आठवणी आहेत. परंतू एकदा एका एका बैठकीत सर्व प्रशासकीय अधिकारी, आमदार, खासदार, नगराध्यक्ष सर्वच शिरपूर शहरातील उपस्थित असतांना मलाही त्या बैठकीत बोलावले होते जसेही मी हॉलमध्ये आले तसे लगेच आमदार अमरीशभाई पटेल यांनी झाशीची राणी म्हणून संबोधत आपण करत असलेल्या कामाची पावती नकळत मला मिळाली. आमचे माजी कर्मचारी व प्रगल्भ व्यक्तीमत्व असलेले भामरे बापूंनी 'शिरपूर आगाराची झाशीची राणी' ही पदवी मला दिलेली होती व ती सर्वत्र पोहचली तो क्षण उल्लेखनीय होता.

पत्ता:- ११,सिंचाई कॉलनी
वलवाडी, देवपूर धुळे

मासिक **शिक्षण यात्री**

**मालकी हक्कासंबंधी व इतर माहिती बाबत**

## निवेदन

फॉर्म नं.४ (नियम ८ पहा)

१) प्रकाशन स्थळ : ३४,क्रांतीनगर, १ली गल्ली, शिरपूर,ता. शिरपूर जि.धुळे ४२५४०५
२) मालक प्रकाशक संपादक : शैला नंदकिशोर हजारे
३) मुद्रक : सतिष कमलसिंग गिरासे, यशवंती ऑफसेट १ ला माळा शिवाजी मार्केट शिरपूर ता.शिरपूर जि.धुळे
४) भारतीय नागरीक आहे काय? : होय.
५) पत्ता : ३४,क्रांतीनगर, १ली गल्ली, शिरपूर,ता. शिरपूर जि.धुळे ४२५४०५

मी शैला नंदकिशोर हजारे याद्वारे जाहीर करीते की, वरील माहिती माझ्या समजूतीप्रमाणे व माहितीनुसार खरी आहे.

दि. ०७/०३/२०१८

शैला नंदकिशोर हजारे

# सावित्रीच्या लेकी...



**सुषमा सुभाष कुलकर्णी**
शिरपूर
चलभाष ८२०८८२८६८०

**शिक्षक पदाची नोकरी सांभाळत कुटूंबाचा रहाटगाडा यशस्वीरित्या हाताळत, पतीच्या सामाजिक कार्याला समर्पण करित आपल्या मुलींना दुय्यम स्थान न देता त्यांना देखील उच्चशिक्षित करून स्वत:च्या पायावर भक्कम उभे रहाण्याची संधी निर्माण करून दिली. मुलगा एम.बी.एस.डॉक्टर असून वैद्यकीय अधिकारी पदावर कार्यरत आहे. अशा सुषमा कुलकर्णी यांनी कुटूंबाच्या उद्धारास स्त्रीचे योगदान अधोरेखीत केले आहे.**

मी वयाच्या १६ व्या वर्षी एस.एस.सी. पास झाले आणि वयाच्या १७ व्या वर्षी माझे लग्न झाले. मी तशी सुखवस्तू घरातून आलेले. माझे वडिल शिक्षक, शेतीवाडी, गडी-माणसे खेड्यज्ञात पण स्वत:चे घरम साकरी  मात्र पतीची नोकरी, तीही(टेंपररी) तात्पुरती मान्यता असलेली.भाड्याचे आणि तेही पत्र्याचे वर तीन भावांचा संसार. एकच खोली. सारे अवघड. पण माझ्या सासुबाई आम्ही त्यांना आई म्हणायचो, खूपच कडक शिस्तीच्या पण अंतकरणाने मायाळू. त्यांनी सारे कुटुंब आपल्या नजरेच्या इशाऱ्याने चालवले. भांडण नाहीकी हेवादावा नाही. आम्हा जावांना त्यांनी पुढील शिक्षणासाठी प्रेरणा दिली. मी डी.एड.झाले. मला तेव्हा तीन मुली होत्या. घरात एकुण नऊ मुली, तीन मुले. साऱ्यांना सासूबाई सांभाळीत. आम्हाला अभ्यासाला व पुढे नोकरीला वेळ मिळाला. आम्ही सर्व पुरूष व बायका नोकरी करु लागलो. सारा आर्थिक व्यवहार आई सांभाळीत. कधी काळी असलेली गरिबी दूर पळाली. समाजात एक सुखवस्तू कुटूंब म्हणून आमच्याकडे पाहिले जाऊ लागले. आई थकल्या. त्यांनी व्यवहार आमच्याकडे सोपवला पण योग्य तेव्हा मार्गदर्शन शेवट पर्यंत दिले.

मी नोकरी करुन घरसंसार चालवला. घरातील सर्व कामे स्वत: करीत असे तिघ मुली शिकल्या एक इंग्रजी माध्यमाच्या शाळेत शिक्षिका तर दुसरी डॉक्टर झाली तर तिसरीने लॉ कॉलेजातून ग्रॅज्युएशन पुर्ण केले. मुलगा तो एम.बी.बी.एस. झाला आज तालुका वैद्यकीय अधिकारी म्हणून सरकारी सेवेत आहे. सून आयुर्वेदात एम.डी. असून शासकीय सेवेत आहे. जावई एक प्राध्यापक, तर एक आय.आर.टी. इंजिनिअर झाले असून सॉफ्टवेअर क्षेत्रात उच्च पदस्थ अधिकारी आहेत तर लहान केमिकल्स इंजिनिअर आहेत. नेमकं सांगायच राहिल माझे पती सामाजिक राजकीय क्षेत्रात तालुक्यातच नव्हे तर जिल्ह्यात नावारुपाला आलेले व्यक्तीमत्व आहेत त्यांना सारे सुभाषदादा म्हणून ओळखतात.

मी या कुटूंबात आली तेव्हा माहेरकडची नातेवाईक मंडळी वडिलांना गरीब कुटुंबात मुलगी दिली म्हणून खूप हसायचे. आज ते सारे गौरवाने पहातात. हे केवळ आमच्या सासूबाई त्यानंतर आम्ही साऱ्या कुटुंबाची धुरा समर्पकपणे सांभाळली म्हणून झाले. ही आत्मस्तुती नाहीतर सिध्द झालेली गोष्ट आहे. कुटुंबाचा खरा उध्दार स्त्रीमुळेच होतो. तीचा आदर करण्यांना तिच्यावर विश्वास टाकल्यानेच होतो. हेच खरे!!

**गुरूदत्त कॉलनी,निमझरी नाका,**
**शिरपूर जि.धुळे**



कष्टकरी महिलांचा सत्कार...आर.सी.पटेल प्रा.आश्रम शाळा वाघाडी,शिरपूर

# सावित्रीच्या लेकी...



**मोनिका अग्रवाल**
जळगांव,
चलभाष ९४२१८८४९००

वाईट अनुभवांची शिकवण व चांगल्या अनुभवांनी प्रेरणा घेऊन 'होमीओपॅथी' या वैद्यकीय क्षेत्रातील वाटचाल करणाऱ्या डॉ.मोनिका अग्रवाल या . या कॉलेजमध्ये प्राध्यापिका म्हणून कार्यरत आहेत. होमीओपॅथीचे विषयज्ञान देण्याबरोबर महिलांसाठी आरोग्याचे प्रश्न, गर्भसंस्कार, आहाराविषयी मार्गदर्शन, योगाची आवश्यकता यावर समुपदेशन त्या करित असतात. याचवेळी स्त्रीयांना मिळालेल्या हक्कांचा दुरूपयोग तर होत नाही ना लक्ष्ज्ञ हा प्रश्नही त्यांच्या मनाला लागून आहे.

मी डॉ.मोनिका विजय अग्रवाल. एक होमिओपॅथिक चिकित्सक, एक योग शिक्षक, एक समुपदेशक, एक शिक्षिका! आज 'सावित्रीच्या लेकी' या नात्याने आपल्याशी हितगुज साधणार आहे.

माझा जन्म खान्देशातील जळगाव जिल्ह्यातील 'चोपडा' या शहरात झाला. तसे तालुक्याचे हे ठिकाण, खूप ओळख नसलेले! पण माझ्या व्यक्तिमत्वाला, माझ्या आयुष्याला घडविले, माझ्या यशाचा पाया रचला, ते ह्याच गावाने!

'प्रताप विद्या मंदिर'-नावाप्रमाणेच प्रतापी असलेल्या नुकतच'शताब्दी' पार केलेल्या या विद्येच्या मंदिरात मी माझे बारावीपर्यंतचे शिक्षण पुर्ण केले. पाठ्यपुस्तकातील, प्रत्येक विषयांचे सखोल ज्ञान देतांना, माझ्या सर्व गुरुजनांनी जीवनाचे धडे ही येथे मला दिले व 'विद्या विज्ञयेन शोभते' हे ठासून मनावर बिंबवले .

मी मारवाडी घराण्यात जन्माला आलेली. त्यामुळे मराठी व राजस्थानी ह्या दोन्ही संस्कृतींनी माझे व्यक्तीमत्व रेखाटले गेले. मुला-मुलींमध्ये कोणतेही भेदभाव न ठेवता माझ्या-आजोबांनी, बाबा आणि त्यांच्या सगळ्या भावांडामध्ये शिक्षणाची गोडी निर्माण केली, प्रत्येक कलेबद्दल कुतूहल निर्माण केलं, प्रत्येक खेळ खेळण्यासाठी प्रोत्साहन दिलं आणि हाच वारसा त्या पिढीनी आमच्या पिढीला दिला. लक्ष्मी आणि सरस्वती असे दोन्हींचे वरदान आमच्या घराण्याला लाभलेले आहे, अशीच आमची गावभर ख्याती! कोणी डॉक्टर, कोणी इंजिनिअर, तर कोणी सी.ए.,कोणी उद्योगपती. अशी एकाहून एक यशस्वी हिऱ्यांची, मोत्यांची खाणच जणू! या वातावरणात, वावरतांना आम्ही ही अगदी लहानपणापासूनच आपआपली स्वप्ने रंगवू लागलो.

माझे एक काका बालरोगतज्ञ! त्यांनी केलेली रुग्णसेवा ही अगदी लहानपणापासूनच माझ्यासाठी प्रेरणास्थान बनली! त्यासोबतच माझ्या स्वत:च्या पित्ताच्या त्रासासाठी होमिओपंथीची उपयुक्तता पाहून माझ्या बाबांनी ह्या चिकित्सापध्दतीचा सखोल अभ्यास केला व मलाही त्यातील बारकावे उलगडून दिले. कुठलीही इजा(side -effects)न करता,जूने व दुर्धर आजार सुध्दा मुळासकट बरे करणारी ही उपचार पध्दती समग्र उपचार पध्दती आहे आणि फक्त रोगाला महत्व न देता प्रत्यक्ष व्यक्तिला महत्व देऊन पूरेपूर विचार करुन उपचार करणारी चिकित्सा आहे, असे अनेक बारकावे लक्षात यायचे आणि ठरलं-आपण होमिओपॅथीक शिकायची! जवळच्याच शहरात शिरपूरला होमिओपॅथीमध्ये पदवी Gold medalist म्हणून पदवी मिळविली.

ज्या उत्साहाने शिक्षण पुर्ण केले, त्याच उत्साहाने जीवनाच्या पुढच्या वाटचालीला सुरुवात झाली. दैवाने ही अशी सुंदर साथ दिली की लग्न होऊन शिरपूर शहरातच आली आणि इथेच कार्यक्षेत्र सुरु केले.

ज्या कॉलेजमध्ये शिक्षण घेतले तेथेच शिक्षिका म्हणून काम करतांना माझ्यातले 'वक्ता' आणि 'शिक्षक'जागरूक झाले. 'होमिओपॅथिचे' विषयज्ञान देतांना, मी हि माझ्या विद्यार्थ्यांना जीवनाचे धडे देण्याचा कसोशीने प्रयत्न करीत असते.



विषयाची, अभ्यासाची गोडी त्यांच्यामध्ये निर्माण व्हावी या सोबतच जीवनाकडे, आपल्या कार्यक्षेत्राकडे बघण्याचा दृष्टीकोन सकारात्मक असावा, अशी माझी धडपड असते. 'ज्ञान दिल्याने ज्ञान वाढते' हे अगदी अजाणवयापासून गायीलेले गाणे खरेच किती समर्पक आहे, याची प्रचिती प्रत्येक लेक्चरबरोबर येत असते. मेडिकल कॉलेजला लेक्चररशिप म्हणजे एक आव्हानच आहे, कारण भरपूर गोष्टी आपल्याला स्वत:ला नीट जमायलाच पाहिजे तरच आपण योग्य रितीने भावी डॉक्टर्स घडवू शकतो, पण जर सकारात्मक दृष्टीकोन असला तर ते आव्हान आपण सहज पेलू शकतो हे मी स्वअनुभवाने ठामपणे सांगू शकते.

माझा मुळ उद्देश 'होमिओपॅथी' चिकित्सा करणे असाच होता म्हणून प्रॅक्टीस ही करणे माझ्यासाठी खूप आवश्यकच होते आणि साधारणत: बारा वर्षापूर्वी मी माझ्या आवडत्या कामाला सुरुवात केली. पेशंट तपासतांना तक्रारी ऐकून घेतांना आपण दिलेल्या औषधींनी आजार बरे होतांना बघितले की अवर्णनीय आनंद होतो. होमिओपॅथिमध्ये समुपदेशानाला सुध्दा खूप महत्व आहे व प्रॅक्टीस करता मी वैयक्तिक समुपदेशनाला सुध्दा खूप महत्व आहे व प्रॅक्टीस करता मी समुपदेशनाकडे कधी वळली हे माझेच मला नाही कळले शिवाय माझ्या स्वत:च्या प्रेग्नंसीच्यावेळेस केलेल्या 'गर्भसंस्काराची' उपयुक्तता अनुभवल्यावर, ह्या क्षेत्रात ही मी माझ्या शहरात 'गर्भसंस्काराचे ' वर्ग सुरु केले. त्यात भर पडली ती प्रत्येक वयोगटातील स्त्रियांचे समुपदेशनाची.

समुपदेशन, आहाराविषयी मार्गदर्शन यासोबतच स्त्रियांना आवश्यकता आहे. योगाची, ध्यानाची हे लक्षात आले आणि रेकी, योगा डिप्लोमा ह्या पदव्या संपादन केल्या.

हळूहळू माझ्या काही मैत्रिणींच्या मुलांचे, माझ्या मुलाच्या मित्रमैत्रणींचे समुपदेशन, अभ्यासातील समस्यांविषयींचे मार्गदर्शन करतांना माझे होमिओपॅथीतील समुपदेशन कौशल्य अनेक पातळींवर सिध्द होऊ लागले. विविध ठिकाणी भाषणांची आमंत्रणे येऊ लागली.

शाळकरी मुलीपासून खेड्यापाड्यातील स्त्रियांना आरोग्याविषयी, आहाराविषयी मार्गदर्शन, वैयक्तिक स्वच्छता,

पाळीतील, गर्भावस्थेतील समस्या, पौगंडावस्थेतील मुलींच्या तक्रारी, स्वत:ची सुरक्षा अशा अनेक विषयांवर मार्गदर्शन करण्याची संधी मिळू लागली.

आपल्या ज्ञानाचा खऱ्या अर्थाने उपयोग होत आहे, ह्याचे ही समाधान मिळू लागले.

हे सर्व कौशल्यपुर्वक हाताळतांना तारेवरची कसरत होतेच. कारण एक स्त्री म्हणून अनेक जबाबदाऱ्या पार पाडायच्या असतात, त्याही परिपूर्ण रित्या! माहेरची, सासरची नातीगोती, छोटे-मोठे समारंभ, एक डॉक्टर म्हणून प्रत्येकाच्या प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष असणाऱ्या अपेक्षा, एक माता म्हणून स्वत:च्या अपत्याला घडविणे, वास्तुप्रतीचे कर्तव्य, स्वत:ची तब्येत अशा अनेक गोष्टींना योग्य न्याय देणे गरजेचे वाटते आणि या सर्वांसाठी माझ्या बाबांनी दिलेले मुलमंत्र मला उपयुक्त ठरते.

अर्थात आप्तस्वकीयांच्या मदतीशिवाय हे सर्व सांभाळणे अशक्यच आहे. आई-वडील, भावंडे, यजमान, माझा मुलगा, सासरची मंडळी, मैत्रीणी ह्या सर्वांचाच माझ्या या यशस्वी वाटचालीत सिंहाचा वाटा आहे. ही वाटचाल अशीच अविरत चालत राहो यासाठी मी स्वत:ला वेळ देणे खूप गरजेचे समजते आणि माझ्या नित्यक्रमात योगा, ध्यान, आध्यात्म, आहारनियोजन या गोष्टी पाळण्याचा मी प्रयत्न करतेच पण सोबत जीवनातील प्रत्येक सण प्रत्येक आनंद लुटण्याचा ही माझा बाणा आहे.

ह्या माझ्या जीवनशैलीत मला अनेक बरे वाईट अनुभवही आले. वाईट अनुभवांनी शिकवण दिली. चांगल्यांनी प्रेरणा आणि काही आकलनही झाले. एका गोष्टीची राहून खंत वाटू लागली आहे. ते म्हणजे स्त्रियांना मिळालेल्या हक्कांचा दुरुपयोग तर होत नाहीये ना? स्त्रियाच स्त्रियांच्या प्रगतीच्या मार्गात अडथळे तर आणित नाहीये ना? असे अनेक प्रश्न भेडसावू लागले आहे. ह्या प्रश्नांचे उत्तरे शोधतांना ध्यानात आले की बदलत्या जीवनशैली वाढत्या जबाबदाऱ्या, उगीचच वाढलेल्या स्पर्धा,चढाओढ, हेवेदावे ह्या गोष्टी मोठ्या प्रमाणात 'ताणाला' आमंत्रण देत आहेत. आणि त्यापाठोपाठ अनेक आजारांना फक्त समुपदेशनाने त्याचा तोडगा निघेल असे वाटत नाही.

खरे तर वेळआली आहे. समाजप्रबोधनाची-आणि हे प्रबोधन प्रत्येकीला स्वत:पासून सुरु करायचे आहे. म्हणजे काही विरोध असे नाही, फक्त स्वत:वर खऱ्या अर्थाने प्रेम करायला शिकायला पाहिजे, हेवेदावे सोडून प्रत्येकीचे आपल्याकडील चांगले इतरांबरोबर शेअर करावे, दुसऱ्यांतील चांगले आपण स्वत:मध्ये उतरवून घेण्यासाठी प्रयत्न करावे आणि झालेल्या सर्व प्रसंगांवर हसतमुखाने मात करुन, नव्या जोमाने प्रत्येक नविन दिवसाची सुरुवात केली की कसे सुंदर बदल घडून येतील! समाजप्रबोधन घडून येईल?'

माझ्या सर्व सखींना हीच कळकळीची विनंती आहे, परमेश्वराने खूप विचारपुर्वक आपणा स्त्रियांना घडविले आहे, सावित्रीबाई,जिजाऊ, झाशीची राणी अशा अनेक कर्तृत्वान स्त्रियांना परमेश्वराच्या या निर्मितीचे चीज केले. आपणही 'सावित्रीच्या लेकी' या नात्याने ही परंपरा जोपासू या प्रेमाचा सुगंध दरवळू या!

**पत्ता:- संजीवनी क्लिनीक**
**(शिरपूर जि.धुळे)**

**सावित्रीच्या लेकी विशेषांकास हार्दिक शुभेच्छा!**



**सौ.छाया शामकांत ईशी**
**नगरसेविका,**
**शिरपूर वरवाडे**
**नगरपरिषद,शिरपूर**



**मराठी मासिक**
**शिक्षणयात्री**

हे मासिक वृत्तपत्र मालक, प्रकाशक,संपादक शैला नंदकिशोर हजारे यांनी मुद्रक सतिष कमलसिंग गिरासे यांच्या मालकीच्या यशवंती ऑफसेट १ ला माळा शिवाजी मार्केट शिरपूर, ता.शिरपूर जि.धुळे ४२५४०५(महाराष्ट्र) येथे छापून ३४, क्रांतीनगर,१ली गल्ली, शिरपूर ता. शिरपूर जि.धुळे ४२५४०५ (महाराष्ट्र). येथे प्रकाशित केले. संपादक -शैला नंदकिशोर हजारे Reg No. MAHMAR2015/67226

# सावित्रीच्या लेकी...



**वनमाला प्रकाश भामरे**
धुळे
चलभाष ९४०५८७२८२३

**दहावीत असतांना 'ही मुलगी शिकणारी नाही' असे भविष्य सांगणारा भोंदूबाबा नेहमीच आठवणीत ठेवत त्याचे भविष्य खोटे ठरवण्यासाठी एम.ए.,बी.एड, एम.एड, एमफील अशा शिक्षणशास्त्रातील प्रवास करणाऱ्या वनमाला भामरे या विविध एमपीएससी स्पर्धा परिक्षात यशस्वी ठरून सध्या अधिव्याख्यातज्ञ (डाएट धुळे) येथे कार्यरत आहेत. आई वडिलांच्या आग्रहास्तव शिक्षण अर्धवट ठेवून झालेले लग्न, पतीच्या सहकार्याने शिक्षणाचे स्वप्न पूर्ण करण्याची मिळालेली संधी, अध्यापन क्षेत्रातील यशस्वी वाटचाल करित महिला म्हणून आपल्या क्षेत्रात ठसा उमटवून आहेत.**

मी वनमाला महारु पवार लग्नानंतरचे नाव वनमाला प्रकाश भामरे. शिक्षण यात्री मासिकेत माझा लेख प्रकाशित होत आहे. त्याबद्दल संपादकीय विशेष आभार. एक महिला म्हणून स्वत:ला सावित्रीची लेक म्हणून मिरवून घेतांना मनात अनेक विचारांची गर्दी आहे की सुरुवात कोठून करावी काय लिहावे आणि काय नाही असा विचार मनात येत आहेत. लिहिण्यासारखे खूप काही पण काही निवडक प्रसंग मांडू इच्छिते.

माझा जन्म हा सर्वसामान्य मध्यमवर्ग कुटूंबात झाला. माझे वडील नोकरीला असल्याकारणाने घरात शैक्षणिक बाबीसोबत जीवनाचे, संस्काराचे भक्कम धडे दिले की ज्यामुळे मला जीवनात मागे वळून पाहण्याची गरज भासली नाही. आई नेहमी म्हणायची की मी शिकू शकले नाही पण तुम्ही शिका, आई वडिलांचे नाव रोशन करा. वडिलांनी देखील माझ्या मुली म्हणजे माझे मुले आहेत ही भावना ठेवून सर्व लाड पुरविले, शालेय खेळात, स्पर्धा, सहभागी होण्याची मुभा दिली. उंच उडी, लांब उडी, धावणे, खो-खो, इ.मैदानी स्पर्धा सोबत शाळेतील बौध्दीक स्पर्धेत देखील अव्वल म्हणून बालपणापासून मेहनतीने यश मिळते हे अनुभवातून शिकत गेले.

परंतु जसजशी मोठी होत होती तसतसे समाजाची मुलीं संदर्भात मानसिकता मुळी म्हणजे परक्याचे धन, मुलींना चूल आणि मूल सांभाळावे लागते. ह्याला मी देखील अपवाद नव्हते. त्यातल्या त्यात आम्ही चार बहिणी व सर्वात लहान भाऊ त्यामुळे घरात लग्नाचे विचार आम्हा सर्व बहिणींच्या बाबतीत १० वी १२ वीत असतांना कानावर पडू लागले. कुटूंब प्रमुख म्हणून सर्वात प्रमुख जबाबदारी आई वडीलांची ही असते की आपल्या मुलीला एक चांगले सासर मिळावे. हा ध्यास घेवून घरात लग्नाचे वारे वाहू लागले. मग तिथे मुलीचे वय शिक्षणांची नितांत इच्छा, मुलीचा जीवनकडे पाहण्याच्या दृष्टीकोन ह्यांना काहीच थारा राहत नाही. असाच अनुभव माझ्या वाट्याला आला. शिक्षणाची नितांत जिद्द असतांना देखील लग्न बेडीत गोवले गेले. परंतु लग्न करतांना मी मात्र आईवडीलांना एकच सांगत होते की, माझे अशा मुलांशी लग्न लावून द्या की जे मला पुढे शिकवतील!

आणि नेमके तसेच झाले. मला सासर असेच मिळाले की ज्यांनी माझे गुण ओळखून शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली. त्यात मला खंबीरपणे साथ देणारे माझे पती ह्यांचे मोलाचे सहकार्य मला लाभले ते शब्दात वर्णन करणे शक्य नाही. माझे लग्न मी पदवीच्या प्रथम वर्षाला असतांनाच झाले. नंतर डी.एड. ला नंबर लागावा म्हणून सतत ३ ते ४ वर्ष अथक प्रयत्न केले. परंतु डी.एड.ला नंबर लागला नाही. परंतु दरम्यानच्या काळात मी पदवी पूर्ण केली त्यानंतर डी.एड.चा विचार सोडून बी.एड. ला नंबर लावण्याचा ध्यास लागला म्हणून बी.एड. केले. तीन विषयात एम.ए.केले. एम.एड, एम.फील केले. शिक्षणशास्त्रात पास झाले. अश्या अनेक पदव्या ह्या लग्नानंतर घेतल्या. म्हणून सर्व मुली व भगीनींना एकच सांगावेसे वाटते की लग्न झाले म्हणजे तुमचे करीअर संपले असे नाही तर तुमच्याकडे प्रगल्भ

इच्छा शक्तही असेल व त्या दिशेने तुम्ही स्वत:ला कार्यप्रवण केले तर तुम्हाला वेळ व संधी ह्या आपोआप उपलब्ध होतात म्हणून संधी शोधा पुढे जा.

बी.एड.झाल्यानंतर नोकरीला शिक्षिका म्हणून ब्राह्मणपूरी (शहादा) येथे लागले. सुरूवातीला पगार नव्हता म्हणून ट्युशन घेत गेले. ज्या विषयाची अडचण त्याविषयी मुलांना शाळेत, घरी मार्गदर्शन करायला लागले. कोणालाही आलेल्या शैक्षणिक समस्येबाबत मार्गदर्शन करणे त्यामुळे असा फायदा झाला की निस्वार्थ भावनेने केलेल्या सेवेमुळे माझे नाव पंचक्रोशीत कसे पेरले गेले हे देखील मला समजले नाही. कारण ज्ञानदान हे श्रेष्ठ दान असते. ह्या ज्ञानाने मला माझ्या नावाची नवी ओळख व प्रसिद्धी मिळवून दिली. ह्याचा फायदा मला असा झाला की माझे वाचन वाढले आणि विविध विषयातील नवनवीन ज्ञान मिळविण्याचा माझा व्यासंग सतत वाढत राहिला व त्यामुळे माझा स्वत:च्या ज्ञानाचा पाया विस्तारत गेला. त्यात माझे पती मला माझ्या उणिवाबाबत मार्गदर्शन करू लागले. त्यामुळे व्यक्तिमत्वातील स्वत:च्या चुका सुधारण्याची संधी मला पतीरूपी मित्राने सतत करून दिली. त्यामुळे अणीवांवर विजय मिळवित गेले. नोकरी करीत असतांना मुलींना शिक्षणाचे महत्व पटवून द्यावे ह्यासाठी महिला मेळावे घेतले. बचत गटाचे महत्व समजावून लागले. पालक मेळावे घेणे एडस सारख्या विषयावर महाविद्यालयामध्ये जाणून व्याख्यान देणे शैक्षणिक विषयावर मार्गदर्शन करणे, वर्तमानपत्रामध्ये शैक्षणिक लेख देणे इ. सर्व कामे आनंदाने करत गेली.कुटूंबाची सेवा करतांना समाजाचे काहीतरी देणे लागतो म्हणून समाजऋण फेडण्यासाठी आलेली प्रत्येक संधीचे सोने केले त्यामुळे मला जिल्हास्तरावर समाज भूषण ह्या पुरस्काराने सन्मानित केले.

प्रगतीची अशी घौडदौड सुरू असतांना स्पर्धा परीक्षांची आवड लागली. आमच्या भामरे कुटूंबासाठी नेहमी आदर्श असलेले डॉ.प्रशांत भामरे वर्ग-१ महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत उत्तीर्ण झाले होते. माझे पती नेहमी मला सांगायचे की एम.पी.एस.सी. परीक्षेच्या अभ्यासाला सुरूवात कर मा.भामरे साहेबांनी घेतलेल्या मेहनती विषयी सांगायचे त्यामुळे नकळतपणे एम.पी.एस.सी.च्या परीक्षा देण्याची बीजे रोवली गेली. त्याचे सर्वात प्रथम यश म्हणजे मी जिल्हास्तरावर विस्तार अधिकारी ह्या परीक्षेत पास होवून निवड झाली. त्यावेळेस मला असा आत्मविश्वास निर्माण झाला की चुल, मूल, नोकरी सांभाळून आपण स्पर्धेत आपले स्थान पक्के करू शकते. ह्या विचारानेच माझ्या यशाची मुहूर्तमेढ रोवली गेली. दुप्पट वेगाने अभ्यासाला लागले. जे मिळेल ते वाचायचे वेळ मिळेल तसा अभ्यास करणे हा छंद जोपासला आणि त्याचे फलित म्हणजे मी एम.पी.एस.सी.च्या गटशिक्षणाधिकारी, शिक्षणाधिकारी समाजकल्याण गट ब, अधिव्याख्याता वर्ग १ व २ च्या परीक्षा लागोपाठ पास होवून मुलाखतीत प्रविष्ठ झाले. शिक्षिका ह्या पदावर यशस्वीरित्या ९ वर्षे वाटचाल करून महाराष्ट्र शासनाच्या वर्ग २ ह्या पदावर यशस्वीरित्या काम पाहत आहे. त्या सर्व यशाचे श्रेय माझे पती, आई वडील व मित्र मैत्रिणींना जाते की ज्यांनी मला शिक्षण अभ्यास करण्यासाठी प्रोत्साहीत केले व स्वत:ला सिद्ध करण्यासाठीचे स्वातंत्र्य दिले.

माझ्या जीवनातील आठवणीत राहिलेला प्रसंग मी आपल्याला सांगू इच्छिते की मी दहावीत असतांना ऐन बोर्डाच्या परीक्षेच्या वेळेस दाराशी ज्योतीषी आले आणि ते घरातील मंडळीविषयी भविष्य कथन करीत होते. माझा पेपर नुकताच संपवून मी घरी येत होते त्यावेळेस हे ज्योतिषी मला अंगणात उभे असतांना दिसले व काहीतरी भाकीत करीत होते. त्यांनी जेव्हा मला पाहिले आणि एक बात प्रकर्षाने सांगितले की ह्या मुलीच्या शिक्षणासाठी जास्त पैसे खर्च करू नका कारण हिचे शिक्षण फक्त ११ वी किवा १२ पर्यंतच आहे. नंतर ह्या मुलीचे लग्न होईल ही मुलगी शिकणार नाही. त्यावेळेस ह्या भोंदुबाबाचा मला प्रचंड संताप आला आणि एका बाजूला हसू आले की मी एवढी हुशार असतांना माझे शिक्षण थांबूच शकत नाही. हे बाबा फक्त अंधश्रद्धेपोटी असे सांगत आहे असे वाटले परंतु पुढे जीवनात असे प्रसंग आले की मला भोंदुबाबा आठवायचा त्याचे भाकित आठवायचे आणि मग माझ्या शिक्षण घेण्याचे जिद्दीचे स्फुरण वाढायचे. भोंदुबाबाचे भाकित वेळोवेळी खोटे कसे ठरेल ह्यासाठी स्वत:ला प्रतिकूल संघर्षमय

परिस्थितीत सिद्ध केले आणि भविष्य हे कोणी सांगितले तसे घडत नसून ते आपण आपल्या मेहनतीने घडवितो हा विश्वास प्राप्त झाला. एक महिला म्हणून शासकीय सेवेत काम करत असतांना अनेक आव्हाने, समस्या, संधी स्विकारणे व स्वत:ला समृद्ध करीत जाणे हाच जीवनात पुढे जाण्याचा मार्ग आहे. मग क्षेत्र कुठलेही असो त्यात प्रत्येकजण यशस्वी झाल्याशिवाय राहणार नाही. आपल्याकडे दृढ संकल्प असेल तर निसर्गातील सर्व शक्ती देखील तुम्हाला मदत करण्यासाठी एकत्र येतात आणि पुढे जाण्यासाठी आपल्याला प्रेरित करतात. म्हणून सर्व महिलांना ह्या लेखातून एवढीच विनंती आहे जीवनात सुख-दुख हे निरंतर आहेच फक्त आपली जिद्द, काम करण्याची क्षमता, स्वत:वर विश्वास ठेवा, प्रत्येक संधी स्विकारा एकवेळ अशी येईल की तुम्ही यशाची उंची गाठलेली असेल म्हणून आव्हाने स्विकारा व विजय मिळवा.!

पत्ता :-मु.पो.तऱ्हाडी
ता.शिरपूर जि.धुळे

**सावित्रीच्या लेकी विशेषांकास हार्दिक शुभेच्छा!**



**सौ.रंजनाताई विठ्ठलराव सोनवणे**

**नगरसेविका,**

शिरपूर वरवाडे
नगरपरिषद,शिरपूर

किसान विद्या प्रसारक संस्थेचे

**डॉ. विजयराव व्यंकटराव रंधे**

**इंग्लीश मेडीयम स्कुल, डे स्कुल व ज्युनियर कॉलेज ऑफ सायन्स**

(ESTD : 1942)

**शिंगावे शिवार, शिरपूर**




**प्रवेश सुरु - 2018-19**

**नर्सरी ते**
**इ. १२ वी (विज्ञान)**

**डे स्कुलसाठी मर्यादीत प्रवेश**

आमच्या स्कुलचे खास वैशिष्ट्ये : अनुभवी व तज्ञ शिक्षकवृंद । प्रत्येक शनिवारी सराव चाचणी । आदर्श परिपाठ । स्पर्धात्मक परिक्षांचे विशेष मार्गदर्शन । अद्यावत संगणक कक्ष । पालकांशी पाल्याच्या शैक्षणिक प्रगतीविषयी सतत संपर्क । उत्कृष्ठ ग्रंथालय विभाग । अद्यावत विज्ञान प्रयोगशाळा । विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व व्यक्तिमत्व विकासावर विशेष भर । प्रशस्त क्रिडा मैदान व क्रिडा संकुल । इ. १० वी, १२ वी च्या निकालाची उज्वल परंपरा । निरोगी व स्वच्छ परिसर । शुद्ध व स्वच्छ पिण्याचे पाणी.

प्रवेशासाठी संपर्क : प्रा. जी.व्ही.पाटील - 9921226279 | श्री. भुषण एस.पाटील - 9766799299 | श्री. प्रमोद जी. पाटील - 9881922547

# सावित्रीच्या लेकी...



**स्वाती विजय देवांग**
धुळे
चलभाष ९४२०६६०१५३

**शिरपूर तालुक्यातील (धुळे) पंचायत समितीत दिव्यांग मुलांसाठी असणाऱ्या विशेष शिक्षिका स्वाती देवांग. स्वत: ८०% दृष्टीदोष असतांना समाजाच्या दिव्यांग महिलांविषयी असलेल्या भावनांना जाणून आहेत. अनुभवत आहेत. मात्र त्याकडे दुर्लक्ष करून स्वत:च्या पायावर उभारल्याचा अभिमान बाळगून आहेत. अंध मुलांसाठी असणारी ब्रेल लिपी, लिहता, वाचता व शिकविता येते. मात्र उच्चशिक्षित समाजाची दिव्यांग मुलांविषयी, महिलांविषयी असलेली दयाभावना त्यांच्या मनात खटकते.**

माझा जन्म १९९० सालचा. जन्मत: दृष्टीदोषाची साथ. दृष्टीदोष असणे तेही मुलीच्या जातीला! यामुळे आईवडीलांसह सारेच आप्तेष्ट गंभीर असल्याचे आपण पाहतो. दृष्टीदोषासारखा शाप समजुन भविष्यात या मुलीचे कसे होणार? ही चिंता पालकांना असते. पण असा विचार माझ्या आई वडीलांचा मुळी नव्हताच. ते सुशिक्षित असल्याने माझ्या इतर भावंडाप्रमाणे वागणूक दिली. शिक्षण दिले. मी देखील सामान्य शाळेत शिकले. कुटूंबाच्या सहकार्य नि पाठिंब्यानेच यशस्वीरित्या शिक्षण (बारावी डी.एड.अंधप्रवर्ग) पूर्ण करुन आवडीच्या क्षेत्रात कार्य करते आहे.

मुलीच्या जातीला अपंगत्वाचा शाप... होय शापच म्हणणारी मंडळी सभोवताली पहातोय, अनुभवतोय, जन्मत: मुलीला काही अपंगत्व असले. तर अशा मुलींकडे दयाभावनेने पहात भविष्यातील चिंता त्रासते. या चिंतेला समाजाचा अशा मुलींकडे पहाण्याचा दृष्टीकोन कारणीभूत असावा असे मला वाटते. म्हणूनच माझ्याही दृष्टीदोषाची (८०%) अडचणीची जाणीव याच समाजाने मला करुन दिली.

अर्थात माझा दृष्टीदोषाचा बाऊ मी कधीच केला नाही नी करत नाही. एका डोळ्याने दिसत नसतांना सुध्दा मी बी.एड.पर्यंत शिकू शकले विशेष शिक्षिकेची(दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी) नोकरी करतेय. या दृष्टीदोषाचा महिला म्हणून होणारा त्रास जाणवला नाही असे नाही. पण मीही त्रासाला जवळ फिरकू दिले नाही.

माझ्यासह आम्ही चार भावंडे, दोन बहिणी, दोन भाऊ. वडील महाविद्यालयात लिपीक, घरची साधारण परिस्थिती. इतर भावंडाप्रमाणेच मी देखील सामान्य शाळेत शिकले. एका डोळ्याने दिसत नसल्याने मला लिहण्या वाचण्यास अडचण होतीच. वही किंवा पुस्तक अगदी डोळ्याजवळ धरावे लागे. पण मी ही जिद्दी होते. बारावीपर्यंत शिक्षण केले.

मला शिक्षक होण्याची अपार इच्छा होती. मात्र हा दृष्टीदोष अडथळा आणू शकतो याची कल्पना नव्हती. शिक्षक व्हावे यासाठी डी.एड. करण्यासाठी आवश्यक ते प्रयत्न केले. मात्र याच दृष्टीदोषाचे कारण देत माझा सामान्य डी.एड.च्या अभ्यासक्रमात प्रवेश नाकरण्यात आला.

'इच्छा तेथे मार्ग' यानुसार माझे प्रयत्न चालूच होते. सुदैवाने मला स्पेशल(विशेष) डि.एड.विषयी माहिती मिळाली. NAB अंतर्गत नाशिक येथे असलेल्या विशेष डी.एड.महाविद्यालयात प्रवेश मिळाला. अंधप्रवर्ग विद्यार्थ्यांसाठी अध्ययन अध्यापनाचे धडे मला येथे मिळाले. ब्रेललिपी ज्ञात झाली. ब्रेल लिपी लिहू शकते, वाचू शकते नि शिकवू पण शकते. माझ्याचा दृष्टीदोषाच्या अडचणीने मला शिक्षक पदासाठी पात्र केले तेही अंध विद्यार्थ्यांची शिक्षक म्हणून ! मला आनंद होता, आजही आहे!

विशेष डी.एड.झाल्यानंतर सर्व शिक्षा अभियान अंतर्गत विशेष शिक्षिका म्हणून मला नोकरी मिळाली. गरीब, वंचित दिव्यांग मुलांच्या समवेत काळ जाणार होता. आवडीचे क्षेत्र होते.

विशेष गरजा असणाऱ्या(दिव्यांग) मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात सामील करणे, त्यांच्या गरजेनुसार सोयी सुविधा देणे, अध्ययनात येणाऱ्या अडचणी दूर करणे असे कामाचे स्वरुप. पेक्षा महत्वाचे पालकांमध्ये जागरुकता निर्माण करण्याची.




अशा दिव्यांग मुलांच्या बाबतीत पालक उदासीन राहून त्यांचा शिक्षणाचा मार्ग त्यांना माहित नसतो. कसा शिकेल या विवंचनेत ते असतांना आमच्यासारखे विशेष शिक्षक त्यांच्या मदतीला धावून या दिव्यांग मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचे काम करतात.

तालुक्याच्या ठिकाणी गटसाधन केंद्रात कार्यालयीन कामकाजाबरोबर विशेष गरजा असलेल्या मुलांना अध्ययनाची सोय करुन देणारी आमची विशेष शिक्षकांची टीम आहे. महिला म्हणून मला अडचण होऊ दिली नाही कि मी स्वत: ती जाणवू दिली नाही. इतर सहकाऱ्यांप्रमाणेच काम करीत रहाते. इतर सहकारीही दुय्यम वागणूक न देता प्रत्येक कार्यात सहभागी करुन घेतात. मला कुठलाही त्रास होणार नाही याची काळजीही घेतात. माझ्या मताचा आदर करतात. कदाचित माझ्या दृष्टीदोषाची कणव असावी!

दृष्टीदोष, अंध असणाऱ्या मुलांना वाचनाचा आनंद देण्यात मला धन्यता वाटते. त्यांना ब्रेल लिपी शिकवणे, वाचन करुन घेणे, अक्षर शब्द यांचे लेखन  यांचे मार्गदर्शन करते असाच एक विद्यार्थी आठवतो.याला ब्रेल लिपी शिकवल्यानंतर तो लेखन वाचन करु लागला. एकदा त्या संपूर्ण वर्गात न घाबरता, डगमगता ब्रेल लिपीतील शब्दांचे वाचन करुन दाखवले. त्यावेळी मला झालेला आनंद काही औरच होता. या क्षेत्रात काम करतांना दिव्यांग मुलांच्या पालकांची मानसिकता बदलणे मोठे आव्हानात्मक काम. दिव्यांग मुलांना शाळेत दाखल करण्यासाठी सर्व प्रथम पालकांना सखोल मार्गदर्शन करावे लागले. ग्रामीण भागात अल्पशिक्षित म्हणा की निरक्षर यांचेकडून योग्य तो प्रतिसाद मिळत नाही परंतू शहरी भागातील उच्चशिक्षित पालकही नकारात्मक असतात.

एकदा शिरपूर(धुळे) शहरातील दिव्यांग विद्यार्थ्याची माहिती मिळाली. शाळेत दाखल नसल्याने शाळाबाह्य ठरला होता. त्याला शाळेत दाखल करण्यासाठी मी व माझे सहकारी बाळा बोरकर तर पालकांना भेटण्यास गेलो. आमचा परिचय करुन दिला असता अक्षरश: आम्हास हाकलून देण्याचा प्रयत्न केला. तरी सुध्दा आम्ही आमचं म्हणणं ऐकून घेण्याची विनंती केली. तेव्हा कुठं आम्हाला घरात बोलावले. चर्चेत समजले की पालक उच्चशिक्षित असून येथील १० वर्षाच्या मुलाला शाळेत पाठवले नव्हते. सखोल चर्चेअंती पालक मुलाला शाळेत पाठवण्यास राजी झाले आणि आज तो मुलगा शाळेच्य प्रवाहात टिकून आहे. मला माझ्या शिक्षक असण्याचा अभिमान नि गर्वही वाटला.

अशा दिव्यांग मुलांसाठी पुढे येणे गरजेचे आहे. अशा मुलांकडे दया भावना, सहानुभूती या दृष्टीने न पहाता त्या एक व्यक्ती म्हणून स्वीकारायला हवे. जे मी अनुभवले आहे.

अश्या दिव्यांग (अंध,अपंग) मुलींच्या बाबतीत समाजानेदेखील दृष्टीकोन बदलला पाहिजे. त्यांचा व्यक्ती म्हणून स्वीकार करतांना समाज अडखळतो. त्यात महिला किंवा मुलगी असेल तर समाज अगदीच संवेदनशील बनतो. मग अशा दिव्यांग मुली-महिलांना शिक्षण ते लग्न जुळेपर्यंत होणाऱ्या त्रासास हाच उच्चशिक्षित समाज जबाबदार ठरतो. वैवाहिक जीवनाचा जोडीदार मिळणे दुरापास्त ठरते. तेव्हा स्वत:च्या पायावर उभारल्याचा स्वाभिमानच मान ताठ करुन जगण्यास शिकवतो. याचाही अनुभव माझ्या पदरी आहे.

**पत्ता :-शिक्षण विभाग,**
**पंचायत समिती,शिरपूर जि.धुळे**

# सावित्रीच्या लेकी...



**ॲड.शालिनी सोनवणे**
शिरपूर,
चलभाष ९८२२४९६२४५

**वकिली व्यवसाय पेशा म्हणून न स्वीकारता प्रामाणिक सेवेची संधी मानणाऱ्या शालिनी सोनवणे या महिला दक्षता समिती, महिला आयोग, भ्रष्टाचार निर्मुलन समिती, विधी सल्लागार समिती अशा विविध क्षेत्रात कार्यरत असून महिलांना त्यांचे हक्क, कायद्याचे ज्ञान यासाठी त्या नेहमी धडपडत असतात.**

गेल्या २० वर्षांपासून वकील व्यवसायात काम करतांना महिलांचे प्रश्न जवळून पहाता आले. पिडीत महिलेचे दु:ख अनुभवता आले. एक महिला म्हणून समरस झाले. महिलांना असणारा जाच, त्याचे स्वरूप यांच्या मुळाशी पहाता आले. कौटुंबिक अडचणींचा ससेमीरा चुकवतांना महिलांची उडणारी तारांबळ मी पाहिली आहे. आणि अशा व्यथीत महिलांना न्याय मिळवून देण्याचा माझा प्रयत्न कायमच राहिला आहे.

शिरपूर (धुळे) तालुक्यातील थाळनेर हे मुळ गाव. घरातले वातावरण शिक्षण पूरक. आई-वडिल दोघेही शिक्षक. आम्हा भावंडानी देखील शिक्षकी पेशा स्वीकारावा अशी त्यांची इच्छा. माझे भाऊ-बहिण शिक्षक झाले देखील मात्र मी वकील पेशाकडे वळाले नि वकिलीच्या व्यवसायात जम बसवून समाज कार्यात भाग घेतेय.

महिला वकील म्हणून या व्यवसायात स्त्रीयांचे प्रश्न आणि समस्या पाहत असतांना महिलांचे कौटुंबिक अत्याचार कायदा २००५ बाबत थोडक्यात सांगू इच्छिते...

आपण भारत या देशात राहतो. ज्या देशात संस्कृती-संस्कार ही देशाला आई-माता म्हणण्याची आहे. ज्या देशात सितेला, लक्ष्मीला पुजले जाते, त्याच देशात वैयक्तीकत: महिलांचे नावे कायदा करण्याची गरज भासते व ती देखील देशाला स्वातंत्र्य मिळून ७० वर्षे झालेनंतर ही आपल्याकरिता अतिशय खेदाची बाब आहे.

वास्तविकत: आपल्या मुळ कायद्यात म्हणजे सर्व कायद्याचा मुळ गाभा असलेल्या आपल्या संविधानात स्त्री-पुरूष सर्व समान असे म्हटले आहे. आर्टीकल १५ नुसार, समान नागरी कायदा हक्क आहेत. स्थावर-जंगम मिळकतीत स्त्रीयांचे अधिकार हिंदु कायद्यान्वये दिले आहेत. महत्वाचे म्हणजे एखाद्या स्त्रीवर तीच्या सासरच्या लोकांकडून अन्याय, अत्याचार झाला तर त्याकरिता भारतीय दंड विधान कायद्याअंतर्गत न्याय मागण्याची तरतुद आहे. तिला फौजदारी दंड संहीते अंतर्गत पोटगीचा हक्क प्राप्त आहे. मग इतक्या सगळ्या तरतुदी असतांना सरकार ला हा कायदा करण्याची गरज का पडावी? तर एक मी महिला वकील म्हणून जेव्हा या व्यवसायात स्त्रीयांचे प्रश्न, त्यांच्या समस्या त्यांचेवरील अत्याचार हे पाहत असते, तेव्हा एक बाब प्रकर्षाने लक्षात आली की कायदे जरी असले तरी त्यांची होणारी अंमलबजावणी त्यांचे व्यवहारीक व सामाजिक जीवनात उमटणारे पडसाद, परीणाम हे अतिशय वेगळे आहेत. स्त्रीवर अन्याय, अत्याचार होतात हे खरे असले तरी त्याचे नीट परिक्षण केल्यास ते अत्याचार हे प्रामुख्याने तिचेवर तीच्या कुटूंबाकडूनच होत असतात. उदा. तिचा पती, सासरचे जवळचे नातलग ह्याकरीता तिने कोर्टात धाव घेतली तर तिला न्याय मिळतो, परंतु त्याकरीता तिला सासरचे घर सोडून माहेरी रहावे लागते. अन स्त्री ही माहेरी राहते ती परक्यासारखी तिचा पालन-पोषन, तिचेकडे समाजाची पाहण्याचा दृष्टीकोन माहेरच्या लोकांचा भाऊ भावजयींचा पाहण्याचा हेतु यामुळेतीला एक वेगळ्याच समस्येला सामोरे जावे लागते. त्याचप्रमाणे फक्त सासरचे लोक त्रास देतात. अत्याचार करतात

असे नव्हे कधी-कधी तर माहेरच्या नातेवाईकांकडून देखील तिचेवर अत्याचार होता या सर्व गोष्टींचा विचार होवूनच या कायद्याचे निर्माण झाले. हा कायदा अस्तित्वात आला.

आता या कायद्यात असे आहे तरी काय? हे पाहू या तर हा कायदा म्हणजे महिलांचे कौटुंबीक अत्याचार कायदा २००५ ह्यामध्ये महीलेला आपल्यावर अत्याचार करणाऱ्या व्यक्तींविरूद्ध आर्थिक सहाय्य मागता येते. तिचे हक्काचे व मालकीचे असलेले स्त्रीधन जे सासरच्या मंडळीनी तिचेकडून काढून घेवून आपल्या ताब्यात ठेवलेले असते ते परत मागता येते. आपल्या लहान बाळाला जर तिचेपासून हिरावून घेवून सासरच्या मंडळीनी ताब्यात ठेवले असेल तर त्याचा ताबा मागता येतो. तिला काही आजार असेल तिचे मुलांना काही औषध पाणी लागत असेल, दवाखान्याचा खर्च असेल तर तो पतीकडून मागता येतो. सासरच्या मंडळीने तिला वर्ष दोन वर्षापासून टाकून घातले आहे व त्यामुळे तिचे समाजात नातेवाईकांत बदनामी होत आहे, तिला टाकून घातलेली स्त्री म्हणून पाहीले जात आहे तर अशावेळी ती अब्रु नुकसानीची मोठी व्याप्ती म्हणजे स्त्रीवर अत्याचा होवून, तिला घरातून हाकलून दिले. टाकून घातले तर त्या स्त्रीने जायचे कुठे? तीला माहेरी देखील राहण्याकरीता जागा नसेल, तीला माहेरच्यांनी देखील राहण्यास हरकत केली, अश्यावेळी ती पीडीत महिला/स्त्री ही कायद्यान्वये शेल्टर हाऊसची मागणी करू शकते. म्हणजे पीडीत महिलेला तिच्या सासरच्या लोकांनी तीचे राहणेची व्यवस्था करावी. भाडेचे खोली घेवून त्याचे भाडे पतीने द्यावे. अशी परिस्थिती नसल्यास सरकार ने या कायद्यांतर्गत आपल्या महाराष्ट्रात अनेक ठिकाणी शेल्टर हाऊस ची निर्मिती केली आहे. तेथे मे. न्यायालय अशा पिडीत महिलेला पाठवू शकते. याकरीता सदर महिलांचे कौटुंबिक अत्याचार कायद्यांतर्गत कलम १२,१९,२०,२१ या अंतर्गत न्याय मागता येतो. इतकेच नव्हेतर केस दाखल होवून चौकशी होवून न्याय मिळणेस विलंब होईल, तोपावेतो पिडीत महिलेच्या पालन-पोषणाचे काय? म्हणून या कायद्याचे कलम २३ अंतर्गत अंतरीम पोटगी (आर्थिक सहाय्य) मागण्याची देखील तरतुद या कायद्यात केलेली आहे.

आता या कायद्याअंतर्गत आपणास दाद ही कुठे मागता येईल ? किंवा कोर्टात केसेस चालण्यास वेळ लागतो अशा परिस्थितीत ह्या कायद्यांतर्गत तहसिलदार संरक्षण अधिकारी (नेमुन दिलेले) यांचेकडे अर्ज करता येतो. तोपर्यंत केस दाखल केल्यास ह्या केसेसच्या नोटीसा या संरक्षण अधिकाऱ्यामार्फत बजावणी केली जाते. तसेच प्रकरणे पेंडीग राहू नयेत. पिडीतेला न्याय लवकर मिळावा ह्या दृष्टीने देखील या कायद्यात तरतुद केलेली आहे. महिलांचे कौटुंबीक अत्याचार कायदा २००५ या अंतर्गत केसेस असल्यास त्यांना प्रथम प्राधान्य देवून त्या ६० दिवसाचे आत निकाली काढाव्या असे कायद्यात म्हटले आहे.

या सर्व बाबी पाहिल्यास खरोखरच ह्या कायद्याची व्याप्ती मोठी असल्याचे स्पष्ट दिसते. आपल्या अवती-भोवती शेजारी पाजारी अशा पिडीत महिला असतील तर त्यांनाही आपण या कायद्याची माहिती सांगून त्यांना त्यांचेवर होणाऱ्या अत्याचार हे थांबवू शकतो व एक चांगला सुज्ञ नागरीक असल्याचे प्रमाण मिळवून एक चांगला भारत, अन्या अत्याचार विरहीत समाज घडविण्याचा दिशेने आपला खारीचा वाटा उचलून सहभाग नोंदवू शकतो.

**पत्ता:- प्लॉट नं.९/बी, जान्हवी पार्क,**
**जुना शहादारोड, एसपीडीएम, कॉलेजजवळ**
**शिरपूर जि.धुळे**

**वर्गणीदारांसाठी आवाहन**

**शिक्षणयात्री मासिकासाठी वार्षिक वर्गणी रूपये ३००/-मनी ऑर्डर, धनादेश किंवा रोखीने द्यावेत.**

पत्ता :- संपादक शिक्षणयात्री, क्रांतीनगर, १ली गल्ली, शिरपूर ता.शिरपूर जि.धुळे (४२५४०५).मोबा. ९८५०९६४६०१/९४०४७५१६५१

Affilation No.1130241

स्व.स्मिता पाटील चॅरीटेबल ट्रस्ट संचलित...

# स्व.स्मिता पाटील पब्लीक स्कूल



## : निवासी :
## सी.बी.एस.ई-
## इंग्रजी माध्यम

संस्थापक



कै.पदम्भूषण दादासाो.
शिवाजीराव पाटील

आश्रयदात्या



कै. विद्याताई पाटील











मा.अनिताताई देशमुख
(अध्यक्षा)

मा.श्री.व्ही.के.पाटील
(संचालक)

मा.श्रीमती.कल्पना सिंह
(प्राचार्या)

## शाळेची ठळक वैशिष्ट्ये

परिसरातील मुला-मुलींसाठी दर्जेदार व आधुनिक निवासी शाळा,कुशल व शिस्तप्रिय प्रशासन,तज्ञ व अनुभवी शिक्षक वृंद, प्रत्येक विद्यार्थ्यांवर वैयक्तिक लक्ष, मर्यादित विद्यार्थी संख्या, प्रशस्त व हवेशिर इमारत, पौष्टिक व शुध्द शाकाहारी भोजन, निसर्गरम्य परिसर,स्वच्छ व सुंदर वातावरण , खेळांसाठी तज्ञ मार्गदर्शक , प्रशस्त क्रिडांगण, ज्युडो-कराटे व मलखांब शिक्षणाची सोय,ग्रामीण भागातील मुला-मुलींना खास प्राधान्य

---


**स्मितनगर,शिवाजीनगर,दहिवद ता.शिरपूर जि.धुळे**

अधिक माहितीसाठी पुढील फोन नंबरवर संपर्क साधावा.

मोबा.९६०७०७०८७७,९८५०००१९३५,९८५०००१९३६ फोन नंबर : ०२५६३-२७२७६,२७६२७७,२७६२७८

वेबसाईट :www.smitapatilpublicschool.in ई-मेल spps457@gmail.com

Reg No. MAHMAR2015/67226 शिक्षण यात्री Postal Registration No.DHL/557/2018-20

# दि शिरपूर मर्चंटस् को-ऑप. बँक लि,शिरपूर

## बँकेच्या सुविधा

- प्रशिक्षित व सेवाभावी कर्मचारी वृंद
- सतत अ वर्ग
- वातानुकुलित बँक
- संपूर्ण संगणकीकृत
- ५०% सोलर पॉवर वापरणारी एकमेव बँक
- गुंतवणुकीत भरघोस वाढविविध
- समाजहिताचे उपक्रम
- वीज बिल भरणा केंद्र
- अविरत ७१ वर्षांची अखंड सेवेची परंपरा
- लॉकर्स सुविधा उपलब्ध
- हिरक महोत्सवाकडे वाटचाल
- तत्पर सेवा व अद्ययावत सुविधा
- भारताचे रूपे नेटवर्कशी
- सभासदांसाठी मृत्यूंजय फंड योजना
- त्वरीत सोने तारणावर कर्ज सुविधा
- सभासदांना रू.१५००००/- चे अपघाती विमा संरक्षण
- ए.टी.एम.,सी.डी.एम.,आर.टी.जी.एस.,एन.ई.एफ.टी,
- सभासदांच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा दरवर्षी गौरवसंलग्न कोणत्याही बँकेच्या एटीएम मधून पैसे काढण्याची सुविधा

**सभासद व ग्राहकांचा जिव्हाळा**
**'आपली बँक मर्चंट बँक'**

### बँकेची प्रगतीची वाटचाल
### (३१-०३-२०१७ अखेर (आकडे लाखात)

| | | | |
|---|---|---|---|
| वसुल भागभांडवल | -२१९.९८ | राखीव व इतर निधी | -८१३.९३ |
| गुंतवणूक | -४७२६.१६ | ठेवी | -१०५०२.९१ |
| कर्जे | -६२६८.७१ | खेळते भागभांडवल | -१२२८३.४१ |
| नफा | -८७.४४ | | |

### बँकेचे ठेवीचे दर

| | |
|---|---|
| ४६ ते ९० दिवस | ७.५ % |
| ९१ ते १८० दिवस | ८% |
| १८१ ते ३६५ दिवस | ८.५% |
| १३ महिनेवरील | ९ % |

### संचालक मंडळ

**मा.श्री.प्रसन्न जयराज जैन (अध्यक्ष), मा.श्री. काशिनाथ सोमा महाजन (उपाध्यक्ष)**

| | | |
|---|---|---|
| मा.श्री. राजेंद्र शि.पंडीत | मा.श्री.तुषार वि.रंधे | मा.श्री.मनोज ओ.अग्रवाल |
| मा.श्री.नवनीत गि.राखेचा | मा.श्री.महेश जयराम लोहार | मा.श्री. सहेबराव भि.महाजन |
| मा.श्री.केवलसिंग बा.राजपूत | मा.श्री.मुकेश ता.अग्रवाल | मा.श्री.किरण य.दलाल |
| मा.श्री. रामचंद्र उखा ठाकरे | मा.श्री.विनोद शां.चावडा | मा.सौ पूनम रा.भंडारी |
| मा.श्रीमती स्मिता व.कोठारी | श्री.शाम गो.जैन (मॅनेजर) | श्री.संजय के.कुलकर्णी (असि.मॅनेजर) |